
# फाईव्ह स्टार न्यूज

वर्ष 11 वे | जून 2024 | अंक 126 वा
















रजि. नं. महा/23991/कोल्हापूर, एफ/21258/कोल्हापूर

## मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले (मॅक)

MAKH
स्था.: 04-08-2007

प्लॉट नं. पी-4, ए एम्-28, मॅक चौक, पंचतारांकीत औद्योगिक वसाहत, कागल-हातकणंगले, जि. कोल्हापूर-416 236.
ऑफिस फोन: (0231) 2305373. मोबा.: 8530445373, 9561445374
E-mail : presidentmakh@gmail.com | Website : **www.makhkolhapur.org**


We Supply
Plumbing Material
uPVC & PVC, HDEP, Large Dia GI & MS & SS, cPVC Pipes & Fitting etc.
Safety Item
Safety Belts, Jackets, Shoes, Goggles, Ear Plugs/ Mufflers, Masks, various type of gloves, Safety Nets etc.
Standard Star Couplings / Spider Couplings
Lovejoy Coupling, Star Coupling
Cylinder Key, Pressure Regulator, Welding Torch & accessories,
Fasteners
Regular/ Hardened (TVS Unbrako) Nut Bolts, Anchor Fasteners, Foundation Bolts Allen Bolts, Roofing Bolts/ Screws, Al Rivets.
Industrial Lubricants
Hydraulic Oil, Cutting Oil, Break Oil, Food Grade Oil and various types of Grease etc.
KOLHAPUR TRADING PVT. LTD.
Single Source Destination For Your Multiple Requirements
Gat No. 356/2 K Five Star MIDC Road, Kagal, Kolhapur 416216
Head Office : 0231-2620315, 2625394 Fax 0231-2620019
Shop : 9921942552, 9921925885
Packing Material
Strap Hand Tensioner & sealer, Plastic Sutli, Packing Clips, BOPP Tape, Water Gummed Tape, Stretch Film, Packing Patti (Pet/PP), & Bubble Sheet etc.
Pneumatic Fitting
Air Blow Guns, PU Pneumatic Pipe And Its Fittings , Pneumatic Control Valves.
Paints
Electric Item
Wires, Cables, Switches, Halogen fitting & Tubes, Aluminium Lugs, Shock Proof Hand gloves, GI Cable Tray, Spark Free Light Fittings etc.
Cleaning Items
Naphthalene Balls, Liquid Soap, Floor Cleaner, Dust Bin, Dust Control Mop, Floor Wiper, Hard Broom, Broom Pipe, Washing Brush, Supli.
Hand Tools
And Further...Samruddhi Unbreakable Plastic Utensils, Roofing Sheet, Electric Hand Tools, Construction Chemical Accessories, Cement , Adhesive Items , Abrasive Item, Stationery Items, Industrial Lubricants
E-mail Id :- ktpl.kagal@ksmgroup.co.in



॥ श्री जोतिर्लिंग प्रसन्न ॥
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
www.adhiengineering.in
Mr. Amol D. Khambe
8087341176
9595525363
Box Type Single Girder Eot Crane
www.adhiengineering.in
www.adhiengineering.in
Double Girder Overhead Cranes
JIB Crane
Scissor Lift Table
Single Girder E.O.T. Crane
Wire Rope Hoist
Modular Wire Rope Hoist
DSL Busbar System
Air Compressor PPR FR Blue Pipeline & Fittings
Reciprocating Air Compressor
Screw Air Compressor
Refrigerated Air Dryer
Chain Hoist
Manual Stacker
Semi Electric Stacker
Fully Electric Stacker
Electric Paper Reel Stacker
Manual Drum Tilter & Lifter
Hydraulic Beam Shifting Trolley
Pallet Truck
Dock Levellers
Single Mast Goods Lift
All Types of Elevator
Aluminium Air Pipe Line
Weight Crane Scale
Webbing Sling
Radio Remote
Push Button Pendant
Filter Element & Filter
LLDPE TUBE
Zero Air Loss Drain Valves
Tec44 Auto Drain Valves
Auto Drain Valves
Compressed Air Fittings
Magnetic Lifter
Mini Electric Hoist
Helical Gear Motor
Hydraulic Puller
Engine Crane
Construction Mini Crane
Geared Trolley
Chain Pulley Block
Electric Winch
Pneumatic-Grease Pump
Hydraulic Service Lift
Vehicle Washer
High-Bay Lights
Street Lights
LED Flood Lights
LED Tube Light
Racking System
Mr. Amol D. Khambe
9595525363
adh
ADhi Engineering
A Name You Can Trust...
Mr. Dhiraj B. Patil
8087341176
Kiran Bungalow, M. G. Patil Chowk, Patil Galli, Unchgaon, Kolhapur-416005. Maharashtra.
email : adhiengineering8485@gmail.com, info.adhiengineering@gmail.com
Website : www.adhiengineering.in
GST No. 27ABEFA3201G1Z1

# PRECISE PEB PVT. LTD.


- Plot No. D 112/3, Kagal-Hat. five star MIDC, Kolhapur, Maharashtra-416216
- Mob. 9921063063 / 7083729009
- Email : info@precisepeb.com
- Website : www.precisepeb.com
- CIN - U45309PN2019PTC184729


**PRECISE PEB** is a full service metal building construction company with the aim to provide quality steel buildings while delivering prompt personalized and professional service. If you can imagine a project, we can build the steel structure to fit your needs. From Farm Buildings to Retail Buildings, Warehouses, Garages / Workshops and specialized applications, **PRECISE PEB** has the expertise and experience to complete your project on time and on budget with civil & building.


## WE PROVIDE - END TO END

- Concept & Architectural Solution in PEB
- Site development / Design Build services (Civil works)
- Supply & installation of steel building and related work.
- Overall responsibility and interface lionising.
- Work shop facility Pullthrow & Palzma cutting machine

## PEB ADVANTAGE

- Larger span
- Faster construction & Completion
- Cost efficiency
- Economical
- Control Quality
- Strength & Stability
















Sanjay D. Pendse 9422044216 | Subodh S. Pendse 9922960961

KP SINCE 1988

# KAYPEE MACHINES PVT. LTD.

A-249, Five Star MIDC, Kagal,
Kolhapur - 416 236

**9922960955, 0231-2305129**

kaypeemachineskop@gmail.com

**Manufacturers of-**

- Engineering & Auto Component Precision Machining.
- Patterns & Dies, Jigs, Fixtures, SPM's.
- Spares for Various Machines & Equipments.
- Power Chucks Reconditioning.
- Machine Maintenance Services.

Near Suresh Machinery,
Shivaji Udyamnagar, Kolhapur-416 008.

**9922960956, 9922960950**

sales.kaypeemachines@gmail.com

**Dealers in -**

- Machines & Equipments.
- Material Handling Equipments.
- Laser Cutting Machines.
- Plasma Cutting Machines.
- Inspection Equipments.
- Machine Tool Accessories.



DMW

# DYNAMIC METAL WORKS

**Manufacturer's of**

1. ALUMINUM CASTING, HEAT TREATMENT & SHOT BLASTING
2. S G IRON & CI CASTINGS

**HARISHCHANDRA S. DHOTRE**

**President :**

Manufacturers Assocation Kagal, Hatkangale, Kolhapur.
Yog Viday Dham, kolahpur.
Akhil Gurav Samaj Sanghtna, Kolahpur Dist.

**HARSHWARDHAN H. DHOTRE**
Mob.8600151546



Factory : Plot No. B-41, Five Star MIDC, Kagal,
Dist. Kolhapur-416 236.
Ph. No. 0231-2305173
Mobile : 9422412903
Email : dynamicmetal1@hotmail.com
Website : www.dynamicmetalworks.in


DARSHAN
COLOUR COATED SHEETS

# DARSHAN ENTERPRISE


Mfg. PPGI Colour Coated Sheets




## Roofing Sheets



## Linear Sheets




Bending Sheets




Doom Bending



Self Tapping Screw



Corner Flash



Redges

Light Blue

Off White


Brick Red

Mist Green

Reliance Green


D-42, Behind Mantri Metallics,5 Star MIDC, Hupari Road, Kagal, Tal. Hatkanangale, Kolhapur - 416236

**Contact - 9922627774**


Industrial Automation
PLC Based Electrical Panels
MCC and Distribution Panles
Industrial Furnace Panels
APFC Panels
Electrical Switchgears
Lighting and Time bell Panels
Shree
|| Sadgurukrupa||
Automation
ISO 9001-2015
Industrial Automation &
Electrial panels manufacturing
company
Address : G-66, Kagal Five Star MIDC,
Kagal, Kolhapur. Mob. 8308949500
Email : suresh.sadgurukrupaautomation@gmail.com


SHREE
SAMARTH KRUPA
E MART
आता कोल्हापूरला जायची गरज नाही
इलेक्ट्रीकल
इलेक्टॉनिक्स्
ॲटोमेशन प्रॉडक्ट
सर्व ई प्रॉडक्टस् आपल्या
कागल पंचतारांकित
एमआयडीसीत.
Plot No. P4, Makh Association Building,
Makh Chowk, Kagal - Hatkanangale MIDC.
8308949500, 9373762980
CONNECT US FOR YOUR
POWERFUL
BUSINESS


FUSION AQUA
FUSION AQUA
MANUFACTURER OF HDPE, PVC &
HYDROPHONICS PIPES & FITTINGS
Plot No. A-233, Kagal-Hatakangale Road,
Five Star MIDC, Kagal, Kolhapur-416 236.
+91 9960376869, +91 9960399494,
+91 9960392424, Off.:+91 9309977494
contact@fusionaqua.in
www.fusionaqua.in
ISO 9001-2015
Certified Mfg.Company
MJP Approved
IS:4984/3016
CM/L 7500589947
MORE
STRENTH
HIGHEST
DURABILITY
HDPE
PIPES
MDPE
PIPES
FITTINGS
HDPE PIPES OF DIAMETER
20MM TO 200MM
MANTRA : 9822518735, 7385304534



संपादकीय

फाईव्ह स्टार न्यूज
जून २०२४

## निकालांचा अर्थ लावताना

अठराव्या लोकसभेसाठी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये भाजपने स्वत: बहुमत मिळवले नसले तरी एनडीए आघाडीला बहुमत मिळाले आहे. 'इंडीया' आघाडीचा विचार केला तर विरोधी पक्षांची कामगिरीही चांगली राहिल्याचे दिसते; मात्र बहुमतापासून त्यांना दूर रहावे लागले आहे. आकडेवारी पाहिली तर हा कौल 'एनडीए' आणि भाजपच्या विरोधात आहे. 2019 च्या निवडणुकीत 'एनडीए'चे कमी-जास्त प्रमाणात असेच स्वरुप होते. तेव्हा एनडीएला 353 जागा मिळाल्या होत्या. त्या घसरत 300 पेक्षा खाली आल्या. अशावेळी प्रारंभिक पातळीवर हा कौल एनडीएच्या विरोधात आणि 'इंडीया' आघाडीच्या बाजूने असल्याचे म्हणता येऊ शकते. ही निवडणूक जनतेने लढली आणि जनतेने आपला जनादेश दिला आहे. भाजपच्या अहंकाराचाही हा पराभव आहे.

दुसरे म्हणजे अतिआत्मविश्वास. केवळ उत्तर प्रदेशच नाही तर अन्य राज्यातही यामुळे नुकसान सहन करावे लागले आहे. केवळ राम मंदिराच्या जीवावर नौका पार होण्याचा मुद्दा नाही. पंतप्रधानांनी भाजपसाठी 370 आणि एनडीए साठी 400 पारचा नारा दिला आणि त्याचाही हा परिणाम झाला. त्याचवेळी सपा आणि काँग्रेसने प्रचारात सरकार स्थापन करण्यासाठी 272 जागा हव्या असताना भाजपला 400 जागा कशाला हव्यात? यावर भर दिला. या मुद्याला दबक्या आवाजात भारताची राज्यघटना बदलण्यासाठीच भाजपला एवढे संख्याबळ हवे आहे असे बोलले गेले. भाजप आरक्षणाची तरतूद बदलेल दलित, आदिवासी आणि ओबीसी समुहाचे नुकसान होईल असे वातावरण तयार झाले. हीच गोष्ट सपा आणि काँग्रेस हे मतदारापर्यंत पोचविण्यात यशस्वी ठरले. भाजप केवळ मते मागत नाही तर मतापेक्षा अधिक मागत आहेत, हे लोकांच्या मनावर ठसविण्यात ते यशस्वी ठरले. त्यामुळे निकालावरुन स्पष्ट होते की , भाजपची कामगिरी ही त्यांच्या अनुरुप नाही.

भाजपची कामगिरी खराब असेल तर त्याचा थेट अर्थ नरेंद्र मोदी नावाची जादू न चालणे. भाजपसाठी मते ओढण्याची त्यांची क्षमता कमी झाली किंवा त्यांची लोकप्रियता ही काही प्रमाणात कमी झाली असे म्हणावे लागेल. कोणत्याही नेत्याला एवढ्या दीर्घकाळ लोकप्रियता कायम ठेवणे ही सोपी बाब नाही. त्याचे श्रेय नरेंद्र मोदी यांनाच द्यावे लागेल. परंतु केंद्र सरकारने ईडी, सीबीआय आणि अन्य सरकारी यंत्रणांचा वापर विरोधकांचे नुकसान करण्यासाठी केल्याचे अनेक जण म्हणत आहेत, अर्थात मोदी यांची प्रतिमा आणि प्रभाव कायम आहे. भाजपसाठी मते खेचण्याची त्यांची क्षमता अजूनही कमी झालेली नाही. एकूणातच दहा वर्षापूर्वीची भाजप आता राहिली नाही आणि ती आता बदलली आहे, असे लोकांना मनोमन वाटले आहे.

संस्थापक संपादक : **श्री. अशोक दुधाणे**
सहसंपादक : **श्री. संजय पेंडसे**
अध्यक्ष : **श्री. हरिश्चंद्र धोत्रे**
उपाध्यक्ष : **श्री. मोहन कुशिरे**
सचिव : **श्री. विठ्ठल पाटील**
खजानिस : **श्री. सुरेश क्षीरसागर**

**फाईव्ह स्टार न्यूज मासिक जाहिरात दरपत्रक**

| जाहिरातीचे प्रकार | मासिक दर | वार्षिक दर |
|---|---|---|
| पूर्ण पान-रंगीत (कव्हर पेज मागील) | - | २५,०००/- |
| पूर्ण पान-रंगीत (आतील पान) | - | २०,०००/- |
| अर्धे पान-रंगीत (आतील पान) | - | १०,०००/- |
| पूर्ण पान (कृष्णधवल) | ₹ १,४००/- | ₹ १६,०००/- |
| अर्धे पान (कृष्णधवल) | ₹ ८००/- | ₹ ९,५००/- |


**जाहिरातीसाठी संपर्क : 8530445373, 9561445374**




मुद्रक : मॅक पंचतारांकीत एम्. आय.डी.सी. यांनी 'फाईव्ह स्टार न्यूज' या नावाने 'मंत्र', राजारामपुरी १३ वी गल्ली, कोल्हापूर येथे छापून मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, फाईव्ह स्टार एम्. आय.डी.सी., कागल-हातकणंगले येथून प्रकाशित केले.

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| क्षणचित्रे | 2 |
| जलस्रोतांचे संवर्धन गरजेचे | 7 |
| मिमांसा मुलींच्या शैक्षणिक भरारीची | 14 |
| दहावीनंतरचा निर्णय घेताना... | 13 |
| रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाचा अन्वयार्थ | 17 |
| सोन्याची साठवणूक का वाढतीय ? | 19 |
| महागड्या 'सुरक्षाकवचा'चा बडगा | 21 |
| कौशल्य विकसनाची गरज | 23 |

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये स्वच्छता अभियान कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न


# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील मॅक चौक येथे वृक्षारोपण करताना मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, मऔवि महामंडळ प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, मप्रनि मंडळ उप प्रादेशिक अधिकारी, प्रमोद माने, मऔवि महामंडळाचे कार्यकारी अभियंता इराप्पा नाईक, उप अभियंता एस.व्ही. अपराज, पर्यावरण तज्ञ उदय गायकवाड व मॅक चे इतर पदाधिकारी व मान्यवर उद्योजक कामगार बंधू



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील मॅक चौक येथे वृक्षारोपण करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिकारी सौ. अश्विनी पाटील समेवत मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, उपाध्यक्ष मोहन कुशिरे, मऔवि महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी राहुल भिंगारे, मप्रनि मंडळ उप प्रादेशिक अधिकारी, प्रमोद माने, मऔवि महामंडळाचे कार्यकारी अभियंता इराप्पा नाईक, उप अभियंता, एस.व्ही. अपराज, पर्यावरण तज्ञ उदय गायकवाड व मॅक चे इतर पदाधिकारी व मान्यवर उद्योजक कामगार बंधू

# मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या वतीने पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात १००० रोपांचे वृक्षारोपण संपन्न



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या पुढाकाराने कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील लक्ष्मी टेकडी ते मॅक चौक येथे १००० रोपांचे वृक्षारोपण करताना मॅक चे माजी अध्यक्ष व संचालक संजय पेंडसे सोबत मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर मा. श्री. मंगेश पाटील, मऔवि महामंडळाचे उप अभियंता एस.व्ही. अपराज व 'मॅक'चे पदाधिकारी



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या पुढाकाराने कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील मॅक चौक येथे वृक्षारोपण करताना मऔवि महामंडळाचे उप अभियंता एस. व्ही. अपराज, मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर मा. श्री. मंगेश पाटील, सोबत 'मॅक'चे इतर पदाधिकारी व मान्यवर उद्योजक कामगार बंधू

# मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजच्या वतीने पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रात १००० रोपांचे वृक्षारोपण संपन्न






जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील मॅक चौक येथे वृक्षारोपण करताना मौर्या ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर मा. श्री. मंगेश पाटील साहेब समवेत मॅक पदाधिकारी व MIDC अधिकारी



# मा. श्री. सुजितकुमार क्षीरसागर, उप विभागीय पोलीस अधिक्षक कोल्हापूर यांच्या समवेत बैठक संपन्न



श्री. सुजितकुमार क्षीरसागर साहेब, उप विभागीय पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांचा स्वागतपर सत्कार करताना
मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत गोशिमा अध्यक्ष नितिनचंद्र दलवाई, उपाध्यक्ष स्वरूप कदम,
ऑन.सेक्रेटरी विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर मॅक चे इतर संचालक व मान्यवर



श्री. सुजितकुमार क्षीरसागर साहेब, उप विभागीय पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांना
कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहतीमधील समस्यांचे निवेदन देताना
मॅक चे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे समवेत गोशिमा अध्यक्ष नितिनचंद्र दलवाई, उपाध्यक्ष स्वरूप कदम,
ऑन. सेक्रेटरी विठ्ठल पाटील, ऑन. ट्रेझरर सुरेश क्षीरसागर मॅक चे इतर संचालक व मान्यवर




पर्यावरण

# जलस्रोतांचे संवर्धन गरजेचे

विकास परसराम मेश्राम
पर्यावरण अभ्यासक

***वर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट रिपोर्ट २०२३ नुसार, गेल्या ४० वर्षांत जगातील पाण्याच्या वापराचे प्रमाण दरवर्षी एक टक्क्याने वाढले आहे. पाण्याच्या वाढत्या मागणीच्या तुलनेत उपलब्धता न वाढल्यामुळे आशिया खंडातील सुमारे ८० टक्के लोकसंख्या पिण्याच्या पाण्याच्या गंभीर संकटाचा सामना करत आहे. या संकटाचा सामना करत असलेली जागतिक शहरी लोकसंख्या २०१६ मधील ९३३ दशलक्ष वरून २०५० मध्ये १.७ ते २.४ अब्ज पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक फटका भारताला बसणार आहे. अशा परिस्थितीत रेन वॉटर हार्वेस्टिंग, नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन, त्यांचा योग्य वापर आणि पाण्याचा अपव्यय रोखणे हाच या संकटातून सुटका होऊ शकतो.***

जलसंकट  ही केवळ आपल्या देशाचीच नाही तर संपूर्ण जगाचीसमस्या आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या म्हणण्यानुसार, आज जगातील २६ टक्के लोकसंख्येला स्वच्छ पिण्याच्या पाण्याच्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. इतकेच नाही तर येत्या २७ वर्षांत म्हणजे २०५० पर्यंत जगातील १.७ ते २.४ अब्ज शहरी लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागणार आहे. याचा सर्वाधिक फटका भारताला बसण्याची शक्यता आहे. तसेच जगातील ४६ टक्के लोकसंख्या स्वच्छतेच्या मानकापासून दूर आहे. या संदर्भात युनेस्कोचे महासंचालक आंद्रे अंजोले म्हणतात की, परिस्थिती इतकी गंभीर आहे की है जागतिक संकट नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वी एक मजबूत आंतरराष्ट्रीय व्यवस्था स्थापन करण्याची नितांत गरज आहे.

वर्ल्ड वॉटर डेव्हलपमेंट रिपोर्ट २०२३ नुसार, २०३० पर्यंत जगातील सर्व लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी आणि स्वच्छता पुरविण्याचे उद्दिष्ट खूप दूर आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, गेल्या ४० वर्षांत जगातील पाण्याच्या वापराचे प्रमाण दरवर्षी एक टक्क्याने वाढले आहे. जगाची वाढती लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक बदल पाहता २०५० पर्यंत याच पद्धतीने वाढ होणे अपेक्षित आहे. आशिया खंडातील सुमारे ८० टक्के लोकसंख्या विशेषतः ईशान्य चीन, भारत आणि पाकिस्तानमध्ये पिण्याच्या पाण्याच्या गंभीर संकटाचा सामना करत आहे. या संकटाचा सामना करत असलेली जागतिक शहरी लोकसंख्या २०१६ मधील ९३३ दशलक्ष वरून २०५० मध्ये १.७ ते २.४ अब्ज पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. याचा सर्वाधिक फटका

भारताला बसणार आहे. ग्लोबल वॉटर डेव्हलपमेंट रिपोर्टचे मुख्य संपादक रिचर्ड कॅनर यांच्या मते, जर ही अनिश्तिता दूर झाली नाही आणि त्यावर उपाय लवकर सापडला नाही, तर या भीषण जागतिक संकटाला तोंड देणे निश्चितच खूप कठीण होईल. त्यामुळेच पाण्याचा अपव्यय थांबवणे अत्यंत गरजेचे आहे.

हवामानातील बदलांमुळे जगातील जलसुरक्षेला धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे, यात शंका नाही. त्यामुळे जगातील पाच अब्ज लोकांवर हे संकट भयावह रूप धारण करत आहे. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी केलेल्या अभ्यासात असे समोर आले आहे की, हवामान बदलाच्या वाढत्या प्रकोपामुळे पाण्याची ही गंभीर स्थिती होत आहे. कारण हवामानाशी निगडीत पर्यावरणीय धोक्यांबाबत अजूनही लोकांना माहिती नाहीये. एवढेच नाही तर हवामान बदल आणि जलसुरक्षा यांचा संबंधही लोकांना माहीत नाही. या अभ्यासात, शास्त्रज्ञांनी जगातील१४२ देशांमध्ये संशोधन केले. त्यात कमी उत्पन्न गटातील २१देश आणि निम्न मध्यम उत्पन्न गटातील ३४ देशांचा समावेश करण्यात आला. यामध्ये संशोधकांनी २०१९ लॉयड्स रजिस्टर फाउंडेशन वर्ल्ड रिस्क सर्व्हेचा डेटा देखील वापरला आहे. शास्त्रज्ञांच्या मते, येत्या २० वर्षांत हे संकट भयंकर रूप धारण करेल आणि लोकांसाठी गंभीर धोका बनेल. या चमूतील संशोधक जोशुआ इनवाल्ड म्हणतात की, सर्वात मोठी गरज पर्यावरणीय समस्यांना ठोस आणि प्रासंगिक बनवण्याची आहे. तरच काही बदल अपेक्षित आहेत.



ग्लोबल कमिशन ऑन द इकॉनॉमिक्स ऑफ वॉटर या जगातील विज्ञान, अर्थशास्त्र आणि धोरण निर्धारणातील १७ तज्ज्ञांच्या गटाच्या मते, सतत वाढत्या उष्णतेमुळे येत्या दोन दशकात पाण्याची टंचाई आणि अन्न उत्पादनात घट होणार आहे. भारतालाही या समस्येला तोंड द्यावे लागेल. २०५० पर्यंत अन्नपुरवठ्यात १६ टक्के घट होऊन अन्न असुरक्षित लोकसंख्या ५० टक्क्यांनी वाढेल. दुसरीकडे या दशकाच्या अखेरीस जगभरातील ताज्या पाण्याच्या पुरवठ्याची मागणी ४० टक्क्यांनी वाढेल. चीन आणि अनेक आशियाई देश, जे सध्या अन्न निर्यातदार आहेत, २०५० पर्यंत निव्वळ अन्न आयातदार बनतील.

आपल्या देशाची पाणीपुरवठ्याची उपलब्धता ११०० ते ११९७अब्ज घनमीटर आहे. २०१० च्या तुलनेत २०५० पर्यंत पाण्याची मागणी दुप्पट होण्याची शक्यता आहे. खरे तर हे संकट सामाजिक आणि आरोग्याचेही संकट आहे. कारण गेल्या ५० वर्षांत पूर, दुष्काळ, वादळ आणि तापमानात कमालीची वाढ यासारख्या पाण्याशी संबंधित आपत्तींमुळे जगात सुमारे २ दशलक्ष लोकांचा मृत्यू झाला आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत जाणार आहे. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे जगातील सुमारे दोन अब्ज लोकांना दूषित पाणी पिण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे जगात पाण्याशी संबंधित आजारांचा धोका वेगाने वाढत आहे. दरवर्षी १४ लाखांहून अधिक लोक जलजन्य आजारांमुळे मृत्युमुखी पडत असल्याची आकडेवारीसमोर आली असून दूषित पाण्याच्या वापरामुळे होणाऱ्या आजारांमुळे ७.४ कोटी लोकांचे आयुर्मान कमी होत आहे. घरांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया न होणे हे त्याचे एक कारण आहे. असे असूनही पिण्याच्या पाण्याची बचत आणि जलसंधारणाबाबत आपण गंभीर नाही. २०२५ मध्ये जगातील चौदा टक्के लोकसंख्येसाठी जलसंकट ही मोठी समस्या बनणार असल्याचा इशारा संयुक्त राष्ट्रांनी दिला आहे. इंटरनॅशनल ग्राउंड वॉटर रिसोर्स असेसमेंट सेंटरच्या मते, आज जगात २७० कोटी लोक आहेत ज्यांना वर्षातून ३० दिवस पाणी संकटाचा सामना करावा लागतो. संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार येत्या तीन दशकांत पाण्याचा वापर एक टक्क्यानेही वाढला तर जगाला मोठ्या जलसंकटाला सामोरे जावे लागणार आहे. पाण्याचा आपल्या जीवनावर प्रत्यक्ष आणि

अप्रत्यक्ष प्रभाव पडतो हे सर्वज्ञात आहे. जलसंकटाचा कृषी उत्पादकतेवर परिणाम होत आहे. जैवविविधता, अन्नसुरक्षा आणि मानवी आरोग्याला धोकाही वाढत आहे.

हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या जलसंकटामुळे जागतिकजीडीपीला २०५० पर्यंत सहा टक्के तोटा सहन करावा लागेल, असे मत जागतिक बँकेने व्यक्त केला आहे. जगातील दोन अब्ज लोकांना अणि जागतिक लोकसंख्येच्या २६ टक्के लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाहीये. जगभरातील ४३.६ कोटी मुले आणि भारतातील १३.३८ कोटी मुलांना त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे पाणी नाही. युनिसेफच्या अहवालात म्हटले आहे की २०५० पर्यंत भारतातील ४० टक्के पाणी संपेल.

आजघडीला आशियातील ८० टक्के लोकसंख्या विशेषतः ईशान्यचीन, पाकिस्तान आणि भारत या संकटाचा सामना करत आहे. युनायटेड नेशन्सच्या मते, शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता नसलेली जागतिक शहरी लोकसंख्या २०१६ मध्ये ९३३ दशलक्ष वरून २०५० पर्यंत १.७ ते २.४ अब्ज पर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

ग्लोबल कमिशन ऑन इकॉनॉमिक्स ऑफ वॉटरच्या अहवालात म्हटले आहे की २०७० पर्यंत ७० कोटी लोकांना पाण्याच्या आपत्तींमुळेविस्थापित व्हावे लागेल. आज जगातील दोन अब्ज लोकांना दूषित पाण्याचे सेवन करावे लागत आहे आणि दरवर्षी सुमारे १४ लाख लोक जलजन्य आजारांमुळे मरण पावत आहेत. जगातील अनेक विकसित देशांमध्ये, लोक थेट नळातून स्वच्छ पाणी पिण्यास सक्षम आहेत. पण स्वातंत्र्याच्या ७७ वर्षानंतरही आपल्या देशात हे शक्य नाही हे खुप मोठं आपले अपयश आहे .

केंद्र आणि राज्य सरकारे घरोघरी नळाद्वारे पिण्याचे पाणी पुरवण्याचा दावा करतात. तथापि, आजही ५ टक्के लोक बाटलीबंद पाणी विकत घेतअसल्याचे वास्तव आहे. जल जीवन मिशनने २०२४ पर्यंत प्रत्येक घरात नळाला पाणी पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. पण देशातील जवळपास प्रत्येक महानगरात, शहरांमध्ये शेकडो छोटे-मोठे वॉटर बॉटलिंग प्लांट सुरू आहेत, जे प्रत्येकापर्यंत पाण्याच्या बाटल्या पोहोचवून जनतेची तहान भागवत आहेत. प्रत्येकाला शुद्ध पिण्याचे पाणी देण्याचा शासनाचा मानस असेल, तर नैसर्गिक जलस्रोतांकडे लक्ष द्यावे लागेल. देशातील सर्व जलस्रोत संकटात आहेत याकडेही सरकार दुर्लक्ष करू शकत नाही. उदासिनतेमुळे तलाव, तलाव, जलाशय नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. देशभरात एकूण २४,२४,५४० जलस्रोत आहेत. त्यापैकी ९७ टक्के ग्रामीण भागात आहेत आणि फक्त २.९ टक्के शहरी भागात आहेत. यापैकी ४५.२ टक्के जलस्रोतांची कधीच दुरुस्ती झालेली नाही, त्यापैकी १६.३ टक्के जलस्रोत वापरात नाहीत. देशातील हजारो जलस्रोत व्यापलेले आहेत. ५५.२ टक्के जलस्रोत खाजगी मालमत्ता आहेत आणि ४४.५ टक्के जलस्रोत सरकारच्या ताब्यात आहेत. जवळपास या सर्वच जलस्रोतांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. कुठे ते कोरडे पडले आहेत, कुठे बांधकामामुळे वापरात नाहीत, तर कुठे भंगारात तुंबले आहेत. त्यांच्या खराब स्थितीचे सर्वात मोठे कारण म्हणजे ते कोरडे होणे, गाळ साचणे आणि दुरुस्तीअभावी ते प्रदूषित बनले आहेत.

नैसर्गिक जलस्रोत आणि नद्या, तलाव, विहिरी, भूजल यांसारख्या नैसर्गिक साधनसंपत्तीचे अवाजवी शोषण यामुळे स्वच्छ पाण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. प्रत्येकाला शुद्ध पिण्याचे पाणी द्यायचे असेल तर नैसर्गिक जलस्रोतांकडे लक्ष द्यावे लागेल.

जागतिक जलसंसाधन संस्थेच्या म्हणण्यानुसार देशाला दरवर्षी ुमारे तीन हजार अब्ज घनमीटर पाण्याची गरज असते. भारताला ४००० अब्ज घनमीटर पाणी पावसातून मिळते. पण फक्त आठ टक्के पावसाचे पाणी साठवले जाते. जलशक्ती अभियानानुसार गेल्या ७५ वर्षांत देशात पाण्याची उपलब्धता झपाट्याने घटली आहे. सन १९४७ मध्ये आमची दरडोई वार्षिक पाण्याची उपलब्धता ६०४२ घनमीटर होती, जी २०२१ मध्ये घटून १४८६ घनमीटर झाली. अशा परिस्थितीत रेन वॉटर हार्वेस्टिंग, नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन, त्यांचा योग्य वापर आणि पाण्याचा अपव्यय रोखणे हाच या संकटातून सुटका होऊ शकतो.





शैक्षणिक

# मिमांसा मुलींच्या शैक्षणिक भरारीची

संदीप वाकचौरे
ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

***गेल्या काही वर्षाचे विविध अभ्यासक्रमांच्या तसेच स्पर्धा परीक्षांच्या निकालांवर नजर टाकली असता अनेक अभ्यासक्रमांमध्ये मुलींच्या निकालाची टक्केवारी सातत्याने वाढते आहे. अनेक वर्षे ज्या व्यवस्थेने मुलींसाठी शिक्षणाचे दरवाजे बंद केले होते त्या मुलींना संधी मिळताच तिचे सोने करण्यास सुरुवात केली आहे. मुलींची गुणवत्ता सर्वत्र वाढते आहे. युपीएससी, एमपीएससी, सीए, सीएस यांसारख्या काठीण्य पातळी परमोच्च असणाऱ्या आणि स्पर्धात्मकताही अधिक असणाऱ्या परीक्षांमध्येही मुलींची भरारी लक्षणीय असल्याचे दिसत आहे. ही बाब अर्थातच स्वागतार्ह असली तरी त्याची मिमांसा होणे गरजेचे आहे. काय आहेत यामागची कारणे ?***

नुकताच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी आणि दहावीच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले. सालाबादप्रमाणे यंदाही या परीक्षांमध्ये मुलींच्या निकालाने आघाडी घेतल्याची बाब समोर आली. गेल्या काही वर्षाचे विविध अभ्यासक्रमांच्या तसेच स्पर्धा परीक्षांच्या निकालांवर नजर टाकली असता अनेक अभ्यासक्रमांमध्ये मुलींच्या निकालाची टक्केवारी सातत्याने वाढते आहे. ही बाब अर्थातच स्वागतार्ह असली तरी त्याची मिमांसा होणे गरजेचे आहे. अनेक वर्षे ज्या व्यवस्थेने मुलींसाठी शिक्षणाचे दरवाजे बंद केले होते त्या मुलींना संधी मिळताच तिचे सोने करण्यास सुरुवात केली आहे. मुलींची गुणवत्ता सर्वत्र वाढते आहे. युपीएससी, एमपीएससी, सीए, सीएस यांसारख्या काठीण्य पातळी परमोच्च असणाऱ्या आणि स्पर्धात्मकताही अधिक असणाऱ्या परीक्षांमध्येही मुलींची भरारी लक्षणीय असल्याचे दिसत आहे.

राज्य परीक्षा मंडळाप्रमाणेच नुकताच केंद्रीय माध्यमिक व उच्चमाध्यमिक परीक्षा मंडळाचा निकाल जाहीर झाला आहे. या निकालामध्ये इयत्ता बारावीचा निकाल ८७.३३ टक्के लागला असून त्यामध्ये ९१.५२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. म्हणजे मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ६.४ टक्के अधिक आहे. दहावीच्या निकालावर नजर टाकली असता त्यातही चित्र बारावीप्रमाणेच आहे. सुमारे ९४.७५ टक्के मुली उत्तीर्ण झालेल्या आहेत. म्हणजे दहावीत देखील २.०४



टक्के मुली मुलांपेक्षा अधिक उत्तीर्ण झालेल्या आहेत. राज्य माध्यमिक मंडळाच्या दहावीच्या परीक्षेसाठी यंदा १५ लाख ६० हजार १५४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यामध्ये सात लाख बत्तीस हजार ७०४ मुली होत्या. त्यातील सात लाख ७८ हजार ५९ मुलींनी परीक्षा दिली आणि त्यातील ७ लाख २८ हजार ११ मुली पास झाल्या आहेत. याचा अर्थ शेकडा ९७.२१ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर मुलांचे शेकडा प्रमाण ९४.५६ इतके आहे. म्हणजे राज्यात २.६४ टक्के अधिक मुली उत्तीर्ण झालेल्या आहेत.

महाराष्ट्रात पुणे, नागपूर, मुंबई, कोल्हापूर ,अमरावती ,नाशिक, लातूर, कोकण आणि छत्रपती संभाजीनगर अशी एकूण नऊ विभागीय मंडळे अस्तित्वात आहेत. या सर्व विभागीय मंडळांच्या निकालांचे शेकडा प्रमाण पाहिले असता कोणत्याही विभागात मुलींपेक्षा मुलांचा निकाल अधिक आहे, असे चित्र दिसत नाही. प्रत्येक मंडळाचे लागलेल्या निकालाचे शेकडा प्रमाण लक्षात घेता मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण एकूण सरासरी निकालापेक्षा अधिक असल्याची बाबही समोर आली आहे. नियमित विद्यार्थ्यांबरोबरच खाजगी स्वरूपात अर्ज सादर करून प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांच्या निकालावर नजर टाकली असता असेच चित्र असल्याचे दिसून येते. राज्यात २५ हजार ८९४ विद्यार्थ्यांनी खाजगी स्वरूपातील अर्ज सादर केले होते. परीक्षेसाठी २५ हजार ३६८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी ९ हजार ७३४ विद्यार्थ्यींनींनी परीक्षा दिली. त्यातील ८ हजार २५० विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या आहेत. म्हणजे इथेही शेकडा प्रमाण८४.७५ टक्के आहे, तर विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण ७७.७३ टक्के आहे. या विद्यार्थ्यांचा शेकडा निकाल ८०.४५ टक्के लागला आहे.

बारावीच्या निकालावर नजर टाकली असता राज्यात बारावीसाठी १४ लाख ३३ हजार ३७१ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी अर्ज सादर केले होते. त्यापैकी १४ लाख २३ हजार ९७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यातील ६ लाख ५७हजार ३१९ मुली परीक्षेसाठी प्रविष्ट झाल्या. ६ लाख २७ हजार ३८८ मुली उत्तीर्ण झालेल्या आहेत. हे उत्तीर्णतेचे शेकडा प्रमाण ९५.४४% इतके आहे. बारावीमध्ये विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९१.०६ टक्के इतकी आहे. खाजगी स्वरूपात अर्ज सादर करून परीक्षेला प्रविष्ट विद्यार्थ्यांची संख्या ८५ हजार ८७८ इतकी आहे. त्यापैकी ३२ हजार ८४१ मुली आहे.यापैकी २२८ हजार २९ मुली उत्तीर्ण झालेल्या आहेत. हे उत्तीर्णचे प्रमाण ६९.५१ इतके आहे. मुलांचे उत्तीर्णतेचे प्रमाण ६५.२७% आहे. या विद्यार्थ्यांचा एकूण निकाल ६६.८९% आहे.

दहावी आणि बारावीच्या स्तरावरती मुलींची गुणवत्ता जशी उंचावलेली दिसते आहे त्या स्वरूपाची गुणवत्ता प्राथमिक स्तरावर देखील विविध सर्वेक्षणात उंचावलेली आढळून येते. केंद्र सरकारच्या वतीने करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण, राज्याच्या वतीने करण्यात येणारे राज्य संपादणूक सर्वेक्षण या सर्वेक्षणांमध्ये देखील तिसरी, पाचवी, आठवीच्या वर्गातील विविध विषयांच्या सर्वेक्षणात संपादणुकीत मुलींची आघाडी असल्याचे निर्देशित होते.

मुलींची आघाडी ही समाधान देणारी असली तरी मुले मागे का पडतात ? याबद्दल विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. साधारणपणे मुलींवरती कुटुंबाची जबाबदारी मुलांपेक्षा अधिक लवकर येते. आपल्या परंपरेमध्ये देखील मुलींवर त्याच स्वरूपाचे संस्कार बालपणापासूनच केली जातात.

घरातील कामे मुली जितक्या प्रमाणात करतात त्या प्रमाणात मुलांचा सहभाग असत नाही. पालक, समाजाचे मुलींवर अधिक दडपण असते. आज विविध समाजमाध्यमांमध्ये माध्यमिक स्तरावरील मुले जितक्या मोठ्या प्रमाणात सहभागी असतात अथवा सक्रीय असतात तितक्या प्रमाणामध्ये मुलींचा सहभाग दिसत नाही. त्यामुळे मुलींचा समाज माध्यमांवर अधिक वेळ खर्च होत नाही. पालकांचा मुलं आणि मुली यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन देखील भिन्न आहे. त्या दृष्टिकोनाचा देखील परिणाम आहे का ? याचाही शोध घेण्याची गरज आहे. मुलींची कष्ट करण्याची वृत्ती, प्रत्येक कामात असणारी सक्रियता, एकाग्रता याचा परिणाम देखील मुलींची गुणवत्ता उंचावण्यात होत असावा असे अभ्यासकांना वाटते.

शालेय स्तरावर असणाऱ्या मुली या समाज माध्यमाच्या विविध साधनापासून दूर असल्यामुळे अभ्यासाच्या प्रक्रियेत अधिक चांगला सहभाग अधोरेखित होत असतो. अभ्यास करताना मुलींची असणारी एकाग्रता, अभ्यास करण्यात असणारी सक्रियता मुलींना अधिक मार्कापर्यंत घेऊन जाते. याखेरीज तन्मयतेने आणि मन लावून अभ्यास करण्याची वृत्ती, मुलांच्या तुलनेत कमी असणारा उथळपणा यांसारखी गुणवैशिष्ट्ये मुलींना यशस्वी बनवत आहेत. अनेक वर्षे शिक्षणापासून दूर असणाऱ्या मुलींच्या मनामध्ये बदललेल्या सामाजिक आणि काहीशा कौटुंबिक वातावरणामुळे महत्वकांक्षा उंचावलेली दिसत आहेत. मुली शिकल्यामुळे त्यांच्या जीवनमानामध्ये आणि जीवन व्यवहारामध्ये झालेले परिणाम शिकू पहाणाऱ्या मुलींच्या मनावर परिणाम करत आहेत. आपल्या परिवारातील अथवा समाजातील एखादी मुलगी शिकल्यानंतर तिचे कुटुंबामध्ये उंचावलेले स्थान यामुळे देखील मुलींना शिक्षणामध्ये रस वाढू लागला आहे.

अनेकदा कुटुंबात मुलगा व मुलगी असेल तर मुलाला शिकवण्यासाठीचा पैसा खर्च करण्याची शक्ती पालक दर्शवतात. मुलीच्या बाबतीत अधिक चांगले महाविद्यालय, चांगला अभ्यासक्रम निवडला गेला तर पैसा द्यावा लागेल म्हणून अनेकदा मुलींना शिकवायचे असले तरी उत्तम दर्जाचे महाविद्यालय अथवा अभ्यासक्रम निवडण्याच्या दृष्टीने पालक फार सक्रियता दर्शवत नाहीत. ही बाब देखील मुलींना चांगले यश संपादन करण्यासाठी प्रेरणा देत असावी. आपल्याला शिकायचे असेल तर अधिक चांगले मार्क मिळवावे लागतील तरच पालक महाविद्यालय प्रवेश घडवून आणतील, ही त्यांच्या मनातील असलेली धारणा मुलींना शिकण्यासाठी प्रेरित करत असावी. मुलींच्या मनामध्ये जबाबदारीची भावना सातत्याने बालपणापासूनच पेरली जाते. त्या भावनेचा सकारात्मक परिणाम शिक्षणाच्या प्रक्रिया देखील होत असला पाहिजे. त्याचबरोबर भविष्याचा विचार करून मुली आपले कुटुंब आणि भविष्यातील उत्तम जीवनासाठी लागणारी आर्थिक परिस्थिती याचा विचार करू लागल्या आहेत. आपल्याला उत्तम जीवन जगायचे असेल, भविष्यातील पिढीचे उत्तम शिक्षण ,आरोग्य जोपासायचे असेल तर दोघांनाही नोकरी करण्याची गरज आहे, ही जाणीव ही मनात घर करू लागली आहे.त्यासाठी आपल्या हाती उत्तम पदवी असायला हवी. त्यासाठी अधिक उत्तम शिकायला हवे ही निर्माण झालेली जाणीव मुलींच्या मनात शिकण्याची धारणा अधोरेखित करू लागली आहे. भविष्याची वेध घेणारी क्षमता आणि दृष्टिकोन विकसित करण्यामध्ये आपला भोवताल काही अंशी यशस्वी झाला आहे. त्यामुळे मुलींच्या दृष्टिकोनात बदल घडताना दिसतो आहे. हा घडणारा बदल अधिक सकारात्मक आहे.त्याचे परिणाम म्हणून शिक्षणाच्या गुणवत्तेत मुलींची आघाडी उंचावताना दिसत आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षणामुळे येणारे स्वावलंबन, स्वातंत्र्य मुलींना अधिक प्रभावित करत आहे. वर्षानुवर्षे आपल्या आया–आज्यांकडूनपुरुषप्रधान व्यवस्थेच्या गोष्टी ऐकत आलेल्या मुलींना आर्थिक सत्तेच्या आधारावर एकाधिकारशाही गाजवणाऱ्या पुरुषसत्ताक कुटुंबपद्धतीला शह द्यायचा आहे. आपल्या विवाहानंतर परावलंबित्वाचं जीणं त्यांना नको आहे. इंटरनेटमुळं विश्वाचं अवकाश खुलं झालं आहे. त्या आकाशात त्यांना स्वतःच्या पंखांनी भरारी घ्यायची आहे. त्यासाठी शिक्षणाचं असणारं महत्त्व त्यांनी ओळखलं आहे. त्यातूनच मुलींच्या यशाचा आलेख उंचावत चालला आहे. सावित्रीबाईंनी मुलींच्या शिक्षणाचा पाया घातला त्याला अनेक वर्षे लोटली. आज मुलींची ही शैक्षणिक प्रगती सावित्रीबाईंनी पेरलेल्या बीजांकुराचं फलित आहे, हे विसरता कामा नये.

# विनम्र आवाहन




*फुल ना फुलाची
पाकळी हवी...
साकारण्या संस्थेची
इमारत नवी !*

नमस्कार !

उद्योजक मित्र हो, सातत्याने गेली 16 वर्षे आपल्या समोर चाललेला आपल्या असोसिएशनचा प्रवास एका स्वप्नपूर्तीच्या टप्प्यावर येऊन पोहोचला आहे. संस्थेने पसरलेल्या विशाल पंखावर आता फुंकर मारुन जीव ओतायचा आहे. आपल्याला अतिभव्य अशा नूतन इमारतीचा संकल्प करायचा आहे.

सध्याच्या आपल्या कार्यालयाशेजारीच एक भव्यदिव्य वास्तुरेखांकन आम्ही बनवलेले आहे. हे रेखांकन बनवताना भविष्यात लागणाऱ्या उद्योजकांच्या सर्व गरजांचा विचार केलेला आहे. नूतन वास्तूमध्ये उद्योगाच्या सोईसाठी एक भव्य सभागृह, संस्थेसाठी सुसज्ज ऑफीस, ग्रंथालय, उद्योजकांसाठी कॅन्टीन, गेस्ट साठी कॅफेटेरिया, आवश्यक गोष्टींसाठी दुकाने, विविध ऑफिसेस, बँक तसेच सर्व उद्योगातील कुशल कामगारांची गरज लक्षात घेऊन "कौशल्य विकास केंद्र" करण्याचा मानस केला आहे. या केंद्रासाठी लागणाऱ्या मशीन्स व टुलरुमचा देखील विचार केलेला आहे. सदर वास्तुच्या स्वप्नपूर्ततेसाठी आपल्याच लोकांकडून आर्थिक मदत जमा करावयाची आहे. यासाठी आपल्या सारख्या दानशूर व्यक्तिंकडून आम्ही मदतीची अपेक्षा करीत आहोत. आपण दिलेल्या एका दान-पाकळीने या फुलाला आकार येणार आहे. आपण आपल्याच नावाने, अथवा आस्थापनेच्या नावाने किंवा आपल्या प्रियजनांच्या नावाने देणगी देऊ शकता. सदरची देणगी ही इन्कमटॅक्स नियमानुसार 80 G व CSR या दोन्हीसाठी पात्र असून संस्थेला 80 G व CSR ही दोन्ही सर्टिफिकेट नोंदणीकृत मिळालेली आहेत.

आपण एखाद्या भागाचा खर्च देखील उचलू शकता. आपल्या माहिती करिता सदर कामाचे रेखांकन व खर्चाचे अंदाज पत्रक सोबत देत आहोत. आपली ही मदत संस्थेच्या इतिहासात कायमचीच कोरली जाणार आहे व येणाऱ्या नवउद्योजक पिढ्यांना तो एक आदर्श व प्रेरणास्त्रोत असेल.

| श्री. सुरेश क्षीरसागर | श्री. विठ्ठल पाटील | श्री. संजय जोशी | श्री. मोहन कुशिरे | श्री. हरिश्चंद्र धोत्रे |
|---|---|---|---|---|
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | बिल्डींग कमिटी-अध्यक्ष | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| 8308949500 | 9881204647 | 9225803098 | 9604112341 | 9422412903 |



दिशा

# दहावीनंतरचा निर्णय घेताना...

डॉ. अ. ल. देशमुख
ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

*दहावीचा निकाल लागल्यानंतर  नेहमीप्रमाणे आता पुढे काय, या प्रश्नाची चर्चा विद्यार्थी आणि पालकांमध्ये सुरू होते. तत्पूर्वी पालकांनी आपल्या पाल्याला मिळालेल्या गुणांबद्दल त्याचं अभिनंदन केलं पाहिजे. दहावीच्या गुणांवरूनच त्याचं पुढचं करिअर ठरणार आहे, असं अजिबात नाही. त्याला कोणत्याही क्षेत्रात प्रवेश घ्या, पण त्याची मानसिकता, भावनिकता, नैतिकता आणि वैचारिक प्रगल्भता कशी उंचावेल, कशी उत्तम राहील हे पाहणे गरजेचे आहे. नवीन क्षेत्रे पाहणे, त्यातलं ज्ञान अवगत करणे हे आव्हान आता पालकांनी स्वीकारायला हवे. त्यासाठी आपली जुनाट मानसिकता सोडून द्यायला हवी.*

दि. २७ मे २०२४ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा राज्य माध्यमिक बोर्ड परीक्षांचा निकाल जाहीर झाला. दरवर्षी दहावीचा निकाल लागला की पालकांची एकच गडबड आणि धावपळ उडते, ती म्हणजे आता पुढे काय करायचं? दहावीची मुलं तशी लहानच आहेत. अजून त्यांना पुरेशी समज आलेली नाही. त्यामुळे आज तरी निर्णय प्रक्रिया पालकांकडेच आहे. मात्र निर्णय घेताना विद्यार्थ्यांचे मत जरूर विचारात घेतले पाहिजे. त्यांच्याशी सखोल चर्चा केली पाहिजे. कारण त्यांच्या मानसिकतेचा मुद्दा यात महत्त्वाचा ठरतो. सध्याच्या काळात मुलामुलींना खूप मोठे एक्सपोझर मिळत आहे. नवनवीन आव्हाने खुणावत आहेत. फक्त आपल्याला ती आव्हाने पेलवतील का याचा नेमका अंदाज त्याला लावता येत नाही. त्यासाठी हवे पालक आणि पालकांचे मार्गदर्शन.

पाच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे  शेतीच्या कामासाठी मी गावी गेलो होतो. सायंकाळी वेळ घालवण्यासाठी मित्राच्या दुकानात गेलो. तिथे एक प्रसन्न आणि भारदस्त व्यक्तिमत्व बसलेले होते. मित्राने त्यांची ओळख करून दिली. मी कुतूहलाने त्यांना सहज विचारले, ''आपण काय करता?'' त्यांनी उत्तर दिले, ''पुण्यात माझा पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याचा व्यवसाय आहे. सध्या माझ्याकडे १८०० ते २००० सोसायटीचे काम आहे. दोनशे कामगार आहेत. वर्षाचा टर्न ओव्हर तीन ते साडे तीन कोटीपर्यंत आहे. थोडी अधिक माहिती

घ्यायची म्हणून मी विचारले, ''या व्यवसायासाठी तुम्ही कोणता कोर्स केला? तो कुठे केला? तो किती वर्षाचा होता?'' त्यांनी शांतपणे उत्तर दिले मी दहावी झालो तेव्हाच ठरवले की आपण हा व्यवसाय करायचा. यासाठी कोणताही कोर्स केला नाही. फक्त असा विचार मनात आला आणि तो बाबांना बोलून दाखवला.बाबांनी आणि मोठ्या भावांनी प्रोत्साहन दिले आणि हा व्यवसाय सुरू झाला. दहावीनंतर सुद्धा एखादा माणूस शून्यातून जग निर्माण करू शकतो हे यातून सिद्ध झालं. आपण तर जाणकार पालक आहात.

गेल्या दशकात शिक्षण आणि उद्योग व्यवसाय क्षेत्रात प्रचंडबदल झालेले आहेत. केवळ उत्तम शिक्षण आणि उत्तम पदवी घेऊन साऱ्या आयुष्याची वाटचाल समर्थपणे होऊ शकत नाही, हे सिद्ध झालेलं आहे. उत्तम नोकरी मिळाली तरी तीही कायमस्वरूपाची असेलच असं नाही, हे वास्तव आहे.

आपला पाल्य उत्तीर्ण झाला असल्यास प्रथमतः त्याच्या उत्तीर्णतेचे स्वागत करा, अभिनंदन करा, आनंद साजरा करा. त्याला किती गुण मिळाले आहेत यावर फार भर देऊ नका. दहावीच्या गुणांवरूनच त्याचं पुढचं करिअर ठरणार आहे, असं अजिबात नाही. पुढच्या करिअरसाठी हवी कमी बुद्धिमत्ता आणि जास्तीत जास्त कष्ट करण्याची तयारी. प्रयत्नशीलता आणि अभ्यास, कठोर परिश्रम, धाडस आणि आत्मविश्वास हे त्या विद्यार्थ्याच्या पुढच्या आयुष्यामधील खरे साथीदार आहेत. त्यामुळे त्याला कोणत्याही क्षेत्रात प्रवेश घ्या, पण त्याची मानसिकता, भावनिकता, नैतिकता आणि वैचारिक प्रगल्भता कशी उंचावेल, कशी उत्तम राहील हे पाहणे गरजेचे आहे.

आज दहावीनंतर करिअरसाठी अनेक वाटा आहेत.११ वी साठी पुढील विभाग आहेत

१) कला शाखा (आर्टस) २) वाणिज्य शाखा (कॉमर्स)३) विज्ञान शाखा (सायन्स) ४) किमान कौशल्य आधारित अभ्यासक्रम (एमसीव्हीसी). ५) पॉलिटेक्निक ६) आयटीआय ७) संगणकधारित शॉर्ट टर्म कोर्सेस. ८) जी डी आर्ट ९) वैद्यकीय सहाय्यक (मेडिकल असिस्टंट).

कला शाखा घेऊन पुढे बीए, एमए होता येते. त्याचबरोबर एमपीएससी यूपीएससी या अभ्यासक्रमाचा पाया म्हणून चांगला उपयोग होतो. वाणिज्य शाखा घेऊन बी.कॉम, एम.कॉम तसेच सीए, सीएस आणि आयसीडब्ल्यूए हे व्यावसायिक अभ्यासक्रम करता येतात. विज्ञान शाखेत दोन विभाग आहेत एक प्युअर सायन्स. यामध्ये फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स आणि बायोलॉजी हे चारही विज्ञानातले विषय घेता येतात. दुसरा बायफोकल. यामध्ये बायोलॉजी घेता येत नाही. मॅथेमॅटिक्स, फिजिक्स, केमिस्ट्री, इंग्रजी व २०० मार्कांचे बायफोकल असे सहाशे गुण यासाठी असतात बायफोकलमध्ये कम्प्युटर, इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रिकल आणि मोटर स्कूटर दुरुस्ती हे वेगवेगळे विषय आहेत. बायफोकल विषयांमध्ये १००गुणांची थिअरी व १०० गुणांचे प्रॅक्टिकल असते.

किमान कौशल्याधारित अभ्यासक्रमामध्ये कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना जास्त वाव आहे. व्यवसाय करायचा असेल तर हे अभ्यासक्रम सर्वोत्तम आहेत. त्यामध्ये कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजी, टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट, फिशरी, इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी, मेकॅनिकल टेक्नॉलॉजी, ऑटोमोबाईल, डीएमएलटी, कुकरी, अॅग्रीकल्चर, व्हेटर्नरी, बुक कीपिंग अँड अकौंटन्सी यांचा समावेश होतो.

पॉलिटेक्निक आणि आयटीआयमध्ये आपल्याला पाहिजे तो तंत्रज्ञानाधारित अभ्यासक्रम घेता येतो. यासाठी शक्यतो शासकीय आयटीआयमध्ये प्रवेश मिळवण्याचा प्रयत्न करावा. शासकीयमध्ये मिळाला नाही तर खाजगी आयटीआयमध्ये सुद्धा चालेल. सध्या असे म्हणतात की, इंजिनिअरपेक्षा आयटीआय झालेल्या विद्यार्थ्यास कंपनीत आणि इंडस्ट्रीजमध्ये लगेच नोकरी मिळते. त्यामुळे आयटीआयला कमी लेखून चालणार नाही. संगणक शॉर्ट टर्म कोर्सेसमध्ये टॅली अॅडव्हान्स अकाउंटिंग,टॅक्सेशन, बँकिंग ऑडिटिंग, ग्राफिक डिझायनिंग, वेब डिझाईनिंग, अॅनिमेशन, डीटीपी सॉफ्टवेअर प्रोग्रामिंग, फोटोग्राफी अशा अनेक वाटा आहेत. हे कोर्सेस केल्यास लगेच नोकरी मिळते. नोकरी मिळाल्यावर नोकरी करता करता बहिस्थ पद्धतीने पदवी सुद्धा प्राप्त करता येते. करिअर म्हणून ही एक वाट अत्यंत चांगली आहे. उगाच पाच-पाच, सहा वर्षे शिकत बसण्यापेक्षा ज्याला गरज आहे त्यांनी दहावीनंतर दोन वर्षात पैसे मिळवण्याची सुरुवात करता येईल. यातून कमवा शिका योजनेला खऱ्या अर्थाने न्याय दिल्यासारखे होईल. योग्य विचार करून धाडसी निर्णय घेणे व त्याप्रमाणे कृती करणे महत्त्वाचे आहे.

एखादे निश्चित ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यामधील आवश्यक ते ज्ञान पद्धतशीरपणे मिळवणे आणि या ज्ञानातून नोकरी व्यवसायात स्थिरावणे याला करिअर म्हणतात. करिअर घडवणे हे एका जिद्दी व महत्त्वकांक्षी

मनाचे लक्षण आहे. प्रत्येक विद्यार्थी गुणवान आहेत, पण कोणत्या क्षेत्रात हे नेमकं शोधलं तर त्या त्या विद्यार्थ्याला त्याच्या गरजेनुसार करिअर घडवता आलं पाहिजे किंवा घडवलं पाहिजे ही सध्या निकोप समाजाची गरज आहे.

आज दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी उघडे डोळे ठेवून समाजात काय चाललेले आहे हे पाहण्याची गरज आहे. डिजिटल तंत्रज्ञान, पर्यटन, अर्थकारण आणि सेवाक्षेत्रे अशा विविध शेकडो नव्या संधी आता उपलब्ध होत आहेत. यामध्ये कष्टाळू व नवनवीन शिकण्याची मानसिक तयारी असणाऱ्यांना आर्थिक उत्पन्नाबरोबरच मानसिक समाधानही मिळत आहे. बऱ्याचदा पालक एखाद्या क्षेत्राच्या लाटेत वाहून जातात. उदाहरणार्थ काही वर्षांपूर्वी एमबीएची अशी लाट आली होती तेव्हा हजारो पालकांनी केवळ ऐकीव माहितीद्वारे आपल्या पाल्याला एमबीएचा कोर्स करण्यासाठी लाखो रुपये खर्च केले होते. आज या क्षेत्राची स्थितीकाय? प्रचंड मंदी आलेली आहे. तेव्हा आपला पाल्य सुशिक्षित बेरोजगार करू नका. नवीन क्षेत्रे पाहणे, त्यातलं ज्ञान अवगत करणे हे आव्हान आता पालकांनी स्वीकारायला हवे. त्यासाठी आपली जुनाट मानसिकता सोडून द्यायला हवी.

एकविसाव्या शतकातील विद्यार्थ्यांना करिअर घडवताना पुढील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

१) पुढील काळामध्ये स्थिर नोकरीची हमी कमी होत जाणार आहे. २) नोकरी असो वा व्यवसाय आपण त्या त्या क्षेत्रातील ज्ञान जर अद्ययावत ठेवले नाही तर आपण स्पर्धेच्या बाहेर फेकले जाऊ. ३) यशस्वी होण्यासाठी केवळ प्रमाणपत्रे पुरेशी नाहीत, तर लोकांशी जुळवून घेणे, आपले म्हणणे इतरांना पटवून देणे, आर्थिक नियोजनाचे कौशल्य आत्मसात करणे यांसारखी सॉफ्ट स्किल्स अंगी असणे आवश्यक आहे. ४) कोणत्याही क्षेत्रात यश मिळवायचं असेल तर संगणक आणि इंग्रजी याचे किमान ज्ञान हे अत्यावश्यक आहे. ५) एखाद्या विशिष्ट क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर त्यामध्ये किती पैसे मिळतील हा विचार न करता आपली कष्ट करण्याची किती तयारी आहे यावर भर द्यावा. ६) अभ्यासक्रम निवडताना ग्लॅमरच्या मागे भुलून न जाता तो पूर्ण करण्यासाठी किती कष्ट घ्यावेलागतील, याचा विचार करावा ७) घाईने निर्णय न घेता तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा. यशस्वी व्यक्तींशी संवाद साधावा. मार्गदर्शन करणाऱ्या अनेक संस्था आहेत, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे आणि शक्यतो ॲप्टीट्युड टेस्ट करावी. वरील गोष्टींचा अभ्यास केल्यास दहावीनंतर काय करावे याचा अंदाज आपल्याला येईल व योग्य निर्णय घेण्यास मदत होईल. पुढील आयुष्यासाठी आपणास मनःपूर्वक शुभेच्छा.

## ‘मॅक’ची वार्षिक सभासद वर्गणी मिळणे बाबत

महोदय,

‘मॅक’च्या सभासद बंधू-भगिनींना विनंती करण्यात येते की, ज्या सभासदांची **वार्षिक सभासद वर्गणी** संस्थेकडे जमा करावयाची राहिलेली आहे अशा सभासदांनी **लवकरात-लवकर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल-हातकणंगले** या नावाने चेक काढून संस्थेमध्ये जमा करून संस्थेस सहकार्य करावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपले विश्वासू,

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. सुरेश क्षीरसागर** | **विठ्ठल पाटील** | **श्री. मोहन कुशिरे** | **श्री. हरिश्चंद्र धोत्रे** |
| ऑन. ट्रेझरर | ऑन. सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |



अर्थकारण

# रिझर्व्ह बँकेच्या लाभांशाचा अन्वयार्थ

नीलेश पुजारी
करसल्लागार

***भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी केंद्र सरकारला २.११ लाख कोटी रुपयांचा लाभांश जाहीर केला. ही रक्कम एक वर्षापूर्वीच्या तुलनेत दुप्पटीहून अधिक आहे. यापूर्वी आरबीआयचा कमाल लाभांश २०१८-१९ मध्ये होता. त्यावेळी आरबीआयने १.७६ लाख कोटी रुपयांचा लाभांश केंद्र सरकारला दिला होता. हा लाभांश केंद्र सरकारसाठी बूस्टर ठरणारा आहे. कारण या निधीच्या मदतीने सरकारला आपली आर्थिक तूट भरून काढण्यास मदत मिळेल. सरकारला वेळोवेळी कल्याणकारी योजनांसाठी पैसा उभारण्याची तयारी करावी लागते. या लाभांशामुळे अशा योजनांसाठीची निधीटंचाई कमी होण्यास मदत होईल.***

भारतीय रिझर्व्ह बँकेने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी केंद्रसरकारला २.११ लाख कोटी रुपयांचा लाभांश जाहीर केला. ही रक्कम एक वर्षापूर्वीच्या तुलनेत दुप्पटीपेक्षा अधिक आहे. भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम १९३४ च्या कलम ४७ (अतिरिक्त लाभांचे हस्तांतर) नुसार अतिरिक्त म्हणजेच खर्च केल्यानंतरही जादा उत्पन्न राहत असेल तर ती रक्कम सरकारला हस्तांतर करण्यात मुभा देते. या अधिनियमातील कलम ४७ नुसार बॅड लोन, अवमूल्यन आणि अकस्मिक खर्चासाठी तरतूद केल्यानंतरही अतिरिक्त रक्कम राहत असेल तर ती रक्कम केंद्र सरकारला द्यायला हवी. बहुतांश देशात अशी प्रक्रिया होते. यूएस फेडरल रिझर्व्ह, बँक ऑफ जपान, बँक ऑफ इंग्लंड, जर्मन बुंडेसबँक यांच्या कायद्यात नफा हा सरकारच तिजोरीत किंवा गंगाजळीत हस्तांतर करायला पाहिजे, असे स्पष्टपणे म्हटले आहे.

### आरबीआयला दमदार फायदा

अतिरिक्त आणि लाभांशांचे आकलन हे विमल जालान समितीने निश्चित केलेल्या आर्थिक भांडवल आराखडा (ईसीएफ) वर आधारित आहे आणि याप्रमाणे आरबीआयला आपल्या ताळेबंदाच्या ५.५ टक्के ते ६.५ टक्क्यांपर्यंत अकस्मिक स्थितीसाठी रक्कम बाजूला ठेवण्याचा सल्ला दिला. आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी आरबीआयने ८७,४१६ कोटी रुपयांचा लाभांश सरकारला दिला. यापूर्वी आरबीआयचा कमाल लाभांश २०१८-१९ मध्ये होता. त्यावेळी आरबीआयने १.७६ लाख कोटी रुपयांचा लाभांश केंद्र सरकारला दिला होता. २००९ ते २०१४ या काळापर्यंत सुमारे १.०७ लाख कोटी रुपयांचा लाभांश आरबीआयने सरकारला दिला. लाभांशांचे हस्तांतर हे जीडीपीच्या सरासरी ०.५ टक्क्यांच्या आसपास राहते. या निधीच्या मदतीने सरकारला आपली आर्थिक तूट भरून काढण्यास मदत मिळेल. त्याचबरोबर नवीन योजना राबविण्यासाठी पैसा हाताशी राहिल. सरकारला वेळोवेळी कल्याणकारी योजनांसाठी पैसा उभारण्याची तयारी करावी लागते. मात्र या लाभांशांच्या रक्कमेमुळे बऱ्याच प्रमाणात निधी उपलब्ध राहू शकतो. केंद्र सरकारचे ध्येय चालू आर्थिक वर्षाच्या काळात तूट आणि महसूल यांच्यात असणारा फरक १७.३४ लाख

कोटी रुपये (जीडीपीच्या ५.१ टक्के) पर्यंत मर्यादित ठेवण्याचे आहे.

## बँकिंग क्षेत्रात व्यापक बदल

गेल्या काही वर्षांत बँकिंग क्षेत्रात रचनात्मक बदल होत आहेत. २६ मे रोजी केंद्रातील मोदी सरकारने दहा वर्ष पूर्ण केले. या काळात बँकिंग क्षेत्रात अनेक सुधारणा लागू केल्या आहेत. २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकारातून सुमारे ५२ कोटी लोकांनी पंतप्रधान जनधन योजनेनुसार खाते सुरू केले. यापैकी ५५ टक्क्यांपेक्षा अधिक खाती महिलांच्या नावावर आहेत. २०१८ मध्ये सरकारने इंडिया पोस्टपेमेंट बँकेची स्थापना केली आणि त्याचा उद्देश पोस्ट ऑफिसचे असणाऱ्या नेटवर्कच्या माध्यमातून बँकिंगला ग्रामीण भागांपर्यंत पोचवण्याचा होता. २०२० मध्ये सरकरने दहा सरकारी बँकांचे बड्या बँकांत विलिनीकरण केले. बँकिंग क्षेत्रासाठी पुर्नभांडवल उभारणी आणि पुर्नरचना तसेच इन्सॉल्वंन्सी अँड बँकरप्सी कोड सारखे मोठे पाऊल उचलले गेले. स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने ७५ जिल्ह्यांत ७५ डिबीयू (डिजिटल बँकिंग युनिट) चा प्रारंभ करण्यात आला. ३५ कोटीपेक्षा अधिक पोस्ट ऑफिसच्या बचत खात्यांना कोअर बॅकिंग प्रणालीने जोडण्यात येत आहे.

## यूपीआयने बदलला खेळ

युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय) आता जागतिक पातळीवर व्यवहाराचा मान्यताप्राप्त प्लेटफॉर्म बनला आहे आणि दरमहा १२०० कोटीपेक्षां अधिक व्यवहार या माध्यमातून होत आहेत. अर्थसंकल्पात भारताने एक डिजिटल चलन योजनेची घोषणा केली. बँकांचा सकल एनपीए हा २०१८ मध्ये सुमारे ११ टक्के होता, तो सप्टेंबर २०२३ मध्ये घसरत तीन टकक्यांपेक्षा कमी झाला आहे. बँकांचा भांडवल उपलब्धता ही ३१ मार्च २०२० मध्ये १४.८ टक्के होती आणि ती आता १९१ बेसिस पॉइंट वाढत ३० सक्टेंबर २०२३ मध्ये १६.६ टक्के झाली. २०२३ मध्ये एचडीएफसी अणि एचडीएफसी बँकांचे विलिनीकरण झाल्यानंतर भांडवलाच्या आघाडीवर ही बँक जगातील चौथ्या क्रमाकांची झाली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा (पीएसबी) फायदा आर्थिक वर्ष २०१४ मध्ये ३७ हजार कोटी रुपये होता आणि तो वाढत २०२३ मध्ये १ लाख ८ हजार कोटी रुपयांवर पोचला. सरकारने आर्थिक वर्ष २०१७ ते २०२१ या काळात 'पीएसबी'मध्ये भांडवल उभारणीसाठी ३.११ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केली. अर्थात गेल्या काही वर्षात व्यक्तिगत कर्जात झालेली वाढ ही चिंताजनक आहे.

## डिजिटल बँकिंग आणि सायबर सुरक्षा

डिजिटल बँकिंगच्या वाढत्या प्रसारात सायबर सुरक्षा हा एक कळीचा मुद्दा बनला आहे. भारतीय फिनटेक उद्योग २०२५ पर्यंत १५० अब्ज अमेरिकी डॉलर होण्याचा अंदाज आहे. आज भारताकडे जागतिक पातळीवर तिसऱ्या क्रमाकांची फिनटेक व्यवस्था आहे. 'डेलॉयट रिसर्च एजन्सी'च्या एका अभ्यासानुसार, देशात आजघडीला ११० कोटी नागरिक मोबाईल वापरत आहेत आणि यात ७२ कोटी नागरिकांकडे स्मार्टफोन आहे. ही संख्या २०२६ पर्यंत शंभर कोटींवर जाण्याची शक्यता आहे. तरीही ऑनलाइन फसवणुकीमुळे केवळ चार कोटी नागरिकच मोबाईल बँकिंगचा वापर करत आहेत. या दहा वर्षात देशात अनेक बँक गैरव्यवहार उघडकीस आले. यात डीएचएफएल (३५ हजार कोटी), एबीजी शिपयार्ड (२३हजार कोटी), नीरव मोदी आणि मेहुल चोक्सी यांचा बँक गैरव्यवहार (१० हजार कोटी) आणि विजय माल्या यांचा बँक गैरव्यवहार ( ९ हजार कोटी) आदींचा उल्लेख करता येईल. गेल्या काही वर्षात बँकांचा एनपीए घटला आहे. मात्र यामागचे वास्तव बुडित कर्ज घोषित करण्याचे प्रमाण. बँकांनी पाच वर्षात जेवढी वसुली केली त्यापेक्षा दुप्पटीने अधिक रक्कम बुडितकर्जात टाकली आहे. गेल्या पाच वर्षात दहा लाख कोटीपेक्षा अधिक कर्ज बुडित म्हणून जाहीर केले आहे.

## बँकांचा कर्ज आणि सुधारणा

बड्या कॉर्पोरेट सेक्टरला दिलेले कर्ज हे बुडित कर्जात सामील करण्याऐवजी कर्ज वसुलीतील प्रक्रियेत सुधारणा करावी लागेल. सरकारने बँकांच्या खासगीकरणाची घाई करू नये. उलट व्यापक प्रमाणात सुधारणा करण्यासाठी लक्ष द्यायला हवे. बॅकिंग क्षेत्र स्वतंत्र मंडळ आणि वेगवान व्यवस्थेतून संचलित केले तर सार्वजनिक क्षेत्रातील बँका देखील अन्य खासगी बँकांप्रमाणे काम करु शकतील. 'नियो बँके'ला (केवळ डिजिटलप्लॅटफॉर्मवर आर्थिक सेवा देणाऱ्या बँका) आता बँकिंग क्षेत्राच्या भविष्याच्या दृष्टीकोनातून पाहिले जात आहे. बॅकिंग व्यवस्थेत सहजपणे सुधारणा आणू शकणारे धोरण आखण्याची आवश्यकता आहे. यानुसार प्रत्येकाला गरजेप्रमाणे कर्ज उपलब्ध होईल. भारताला डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चर (डीपीआय) च्या क्षेत्रात आघाडी मिळवण्यासाठी सातत्याने रोबोटिक प्रोसेस ऑटोमेशन (आरपीए), आर्टिफिशियल इंटिलिजन्स, मशिन लर्निंगचा लाभ उचलण्याची गरज आहे.

आंतरराष्ट्रीय एजन्सी 'पीडब्लूसी'च्या सर्वेनुसार भारत हा २०४० पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमाकांचे बँकिंग हब होऊ शकते. बँकांनी आता वेल्थ क्रिएटर्सच्या भूमिकेला मागे टाकत जॉब क्रिएटर्सच्या भूमिकेत यायला हवे आणि बँकांबरोबरच देशाचा ताळेबंद देखील चांगला करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. वास्तविक 'अमृत'काळात विकसित देश म्हणून होणाऱ्या प्रवासात निकोप बँकिंग प्रणाली उभारणे शक्य आहे आणि त्यादृष्टीने वाटचाल सुरू झाली असल्याचेही विश्वासाने सांगता येईल. तरीही विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेत एक केंद्रीय बँक म्हणून वेळोवेळी आरबीआयने सजग राहणे आणि खबरदारी घेणेफायदेशीर असते. कारण जागतिक पातळीवर घडणाऱ्या कोणत्याही आर्थिक घटनांचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होत असतो.



मिमांसा

# सोन्याची साठवणूक का वाढतीय ?

डॉ. अश्वनी महाजन
ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ

*भारताचा परकी चलन साठा हा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ६४८.६ अब्ज डॉलरपर्यंत पोचला. परकी चलन साठ्यात सोन्याचा वाटा ५५.८ अब्ज डॉलरपर्यंत पोचला. एका आठवड्यात १.२४ अब्ज डॉलरची वाढ झाली. जगात अधिकृत सोन्याच्या साठ्याच्या दृष्टीने भारत नवव्या स्थानावर आहे. 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल'च्या आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये विविध देशांच्या केंद्रीय बँका आणि अन्य संस्थांकडून ४५.१ टन सोने खरेदी झाले आणि ते आता २०२२ मध्ये ११३५.७ टनवर पोचले. अर्थात दागिन्याच्या रुपातून सोन्याची मागणी ही पूर्वीच्या तुलनेत कमी होऊ लागली आहे. सोन्याच्या वाढत्या मागणीने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे डॉलरचे राज्य आता संपत आले का? आणखी एक प्रश्न म्हणजे सोन्याचे महत्त्व आंतरराष्ट्रीय व्यवहारात देखील वाढणार आहे का? त्याचे उत्तर भविष्यातील स्थितीत दडलेले आहे.*

पहिल्यां जागतिक महायुद्धानंतर जगात डॉलरचे महत्त्व वाढले. तत्कालिन काळात अमेरिकेचे सहकारी देश सामानाच्या बदल्यात सोने देऊ लागले तेव्हा अमेरिकेत अधिकृतरित्या सोन्याचा मोठा तयांर झाला. युद्धानंतर अनेक देशांनी आपल्या चलनाला डॉलरशी जोडले आणि गोल्ड स्टँडर्डचे युग एकार्थाने संपले. कमी वेळातच डॉलर हे जगातील सर्वात लोकप्रिय चलन बनले. सर्व देशांनी आपला परकी चलन साठा डॉलरमध्ये ठेवण्यास सुरुवात केली. १९९९पर्यंत जगातील एकूण परकी चलन साठ्यात डॉलरचा वाटा ७१ टक्क्यापर्यंत वाढला. मात्र युरोपमध्ये सर्वसमावेशक युरो चलन आले आणि बहुतांश युरोपीय देशांनी डॉलरऐवजी युरो ठेवण्यास सुरुवात केली. त्यामुळे रिझर्व्ह करन्सीत डॉलरचा वाटा कमी होऊ लागला आणि २०२१ पर्यंत तो ५९ टक्क्यांवर आला. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनुसार, डॉलरचा जागतिक राखीव चलनामधील वाटा हा २०२३ मध्ये ५८.४१ टक्के होता.

महत्त्वाची बाब म्हणजे डॉलरचे महत्त्व कमी झाले असले तरी जगातील सर्वात लोकप्रिय चलन म्हणून आजही त्याची ख्याती आहे. युरोचा वाटा अजूनही २० टक्केच आहे. बहुतांश आंतरराष्ट्रीय व्यवहार डॉलरमध्येच होतात. या कारणांमुळे डॉलरचे फार अवमूल्यन झाले नाही. भारतीय रुपयांचा विचार केल्यास १९६४ मध्ये एक डॉलर ४.६६ रुपयास मिळत होता, तो आज ८३.४ रुपयांना मिळत आहे. मात्र काही काळापासून जगातील

अनेक देशातून डॉलरमुक्तीचे संकेत मिळत आहेत. डॉलर सतत मजबुत होत असल्याने अनेक देशांना विशेषत: विकसनशील देशांना बरेच नुकसान सहन करावे लागत आहे.

गेल्या काही काळापासून भारत सरकार आणि आरबीआयकडून आंतरराष्ट्रीय व्यवहार रुपयांत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सुमारे २० देशांनी यावर सहमती दर्शविली आहे. दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे चढउतार आणि प्रामुख्याने रशिया युक्रेन युद्धांमुळे अमेरिका आणि युरोपीय देशांच्या निर्बंधामुळे व्यवहारात येणाऱ्या अडचणी पाहता अन्य देशांनी स्थानिक चलनात व्यवहार करण्याचा प्रयत्न सुरू केला. डॉलरबाबत नाराजी पसरण्याचे कारण म्हणजे अमेरिकेने रशियाला आक्रमक असल्याचे जाहीर करत त्याचा सर्व डॉलरचा राखीव साठा जप्त केला. त्यामुळे अन्य देश भयभीत झाले. आपल्यालाही असा अनुभव येऊ शकतो, असे त्यांना वाटू लागले. असे घडल्यास आपल्यालाही रशियासारख्या अडचणींचा सामना करावा लागेल, असा विचार अनेक देश करू लागले. अशावेळी सर्व देश दोन मार्गाने प्रयत्न करू लागले. स्थानिक चलनात व्यंवहार करणे आणि दुसरे म्हणजे डॉलरच्या जागी सोन्याच्या साठ्यात वाढ.

भारताचा परकी चलन साठा हा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात ६४८.६ अब्ज डॉलरपर्यंत पोचला. मात्र यादरम्यान एक महत्त्वाची गोष्ट घडली अणि ती म्हणजे परकी चलन साठ्यात सोन्याचा वाटा वाढणे. थोडाथोडका नाही तर तो ५५.८अब्ज डॉलरपर्यंत पोचला. एका आठवड्यात १.२४ अब्ज डॉलरची वाढ झाली. एकाच आठवड्यात सोन्याचा साठा सहा टनने वाढला. मागील वर्षाच्या तुलनेत भारताचा सोन्याचा साठा १३ टन अधिक आहे. जगात अधिकृत सोन्याच्या साठ्याच्या दृष्टीने भारत नवव्या स्थानावर आहे. 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल'च्या आकडेवारीनुसार, २०२१ मध्ये विविध देशांच्या केंद्रीय बँका आणि अन्य संस्थांकडून ४५.१ टन सोने खरेदी झाले आणि ते आता २०२२ मध्ये ११३५.७ टनवर पोचले.

२०२३ मध्ये केंद्रीय बँकेने १०३७ टन सोने खरेदी केले. अर्थात दागिन्याच्या रुपातून सोन्याची मागणी ही पूर्वीच्या तुलनेत कमी होऊ लागली आहे. त्याचेळी गुंतवणूक म्हणून सोन्याला पसंती दिली जात आहे. गेल्यावर्षी केंद्रीय बँकांकडून सोने खरेदीत विक्रमी वाढ झाल्याने जगात सोन्याची मागणी वाढली आहे. गेल्या दोन तीन वर्षात सोन्याच्या किंमतीत वाढ झाली आहे. २०१८ मध्ये सोन्याची किंमत १२६८.९३ डॉलर प्रती औस असताना २०२४ मध्ये ती २१२६.८२ प्रति औसवर पोचली. म्हणजेच सहा वर्षात कमी काळात सोन्याची किंमत ६७.६ टक्क्यांनी (सुमारे ९.७ टक्के वार्षिक) वाढली. १९८८ मध्ये सोन्याची किंमत ४३७ डॉलर प्रती औस होती आणि ती २०१८ मध्ये १२६८.९३ पर्यंत पोचली. म्हणजे ही वाढ ३.६१ टक्के होती. मात्र गेल्या सहा वर्षांत सोन्याची किंमत ९.७ टक्के दराने वाढली. अशोवळी आर्थिक विश्लेषक जागतिक चलन आणि आर्थिक स्थितीतील महत्त्वाच्या बदलाकडे अंगुलीनिर्देश करत आहेत.

पहिले कारण म्हणजे अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हकडून व्याजदर कमी होण्याची शक्यता. व्याजदर कमी केल्याने नागरिक आर्थिक मालमत्तेऐवजी सोने खरेदीकडे वळतील, अशी आशा आहे. अशावेळी व्याजदर कमी झाले तर सोन्याला मागणी वाढेल. दुसरे कारण म्हणजे चीनसह जगभरातील सर्व केंद्रीय बँका आता अधिकाधिक सोन्याची खरेदी करत आहेत. ही स्थिती इतक्यात थांबण्याची शक्यता नाही. तिसरे म्हणजे सोन्याच्या किंमतीत वाढीची अपेक्षा केली जात आहे. अशावेळी केंद्रीय बँकांकडून सोन्याच्या खरेदीची शक्यता वाढली आहे. कारण जर केंद्रीयबँक आपल्या परकी चलन साठ्यात सोन्याचा वाटा वाढवत असतील तर सोन्याच्या वाढत्या किंमतीने त्याचा परकी चलन साठा आपोआप वाढेल.

सोन्याच्या वाढत्या मागणीने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. यात सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे डॉलरचे राज्य आता संपत आले का? आणखी एक प्रश्न म्हणजे सोन्याचे महत्त्व आंतरराष्ट्रीय व्यवहारात देखील वाढणार आहे का? त्याचे उत्तर भविष्यातील स्थितीत दडलेले आहे. मात्र जग आता डॉलरशिवाय व्यवहाराकडे वाटचाल करत आहे अणि नव्याने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेबरोबरच अनेक देश देखील आपल्या परकी व्यवहारात देशांर्तगत चलनाचा आधार घेताना दिसत आहे. अशावेळी डॉलरला पर्याय म्हणून सोन्याला अधिक प्राधान्य दिले जाईल. जगातील अनेक देश अमेरिकेने जप्त केलेल्या परकी चलनसाठ्याने साशंक झाले आहेत. कारण रशियाला अनुभव आला आहे. भारत आणि चीनसहजगात सोन्याच्या वाढत्या मागणीचे हे एक प्रमुख कारण ठरत आहे.




# महागड्या 'सुरक्षाकवचा'चा बडगा

सूर्यकांत पाठक
कार्याध्यक्ष,
अ.भा. ग्राहक पंचायत

नोंद

***आजकाल आरोग्य सेवा महाग झालेली असताना डॉक्टरांचे तपासणी शुल्क आणि रुग्णालयाचे भलेमोठे बिल हे प्रत्येकाच्या आवाक्यातील गोष्ट नाही. अशावेळी प्रत्येकाचा आरोग्य विमा असणे गरजेचे झाले आहे. पण गेल्या एक वर्षात हेल्थ इन्शूरन्सच्या हप्त्यात २५ ते ५० टक्के वाढ झाली असून ईर्डाने केलेल्या नियमबदलांमुळे आगामी काळातही विमा कंपन्यांकडून आणखी दहा ते पंधरा टक्के वाढ केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे विमाधारकांत चिंतेचे वातावरण आहे. दुसरीकडे गेल्या तीन वर्षांत सुमारे ४३ टक्के पॉलिसीधारकांना दावे नाकारणे, पेमेंट आणि त्यांच्या सेटलमेंटसाठी बराच वेळ लागणे यासारख्या आव्हानांचा सामना ग्राहकांना करावा लागल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. एकीकडे दरवाढ आणि दुसरीकडे त्याचा लाभ घेतानाच्या अडचणी या दुहेरी संकटांबाबत ईर्डा काही भूमिका घेणार की नाही?***

बदललेली जीवनशैली विविध आजारांसाठी कशी पोषक ठरत आहे, याबाबत आरोग्य तज्ज्ञांकडून वारंवार माहिती दिली जात आहे. पण सध्याच्या स्पर्धात्मक युगाचा रेटाच इतका आहे की ताणतणाव हे जीवनाचे अविभाज्य अंग बनले आहेत. याचबरोबरीने अनिश्चितताही कमालीची वाढली आहे. कोरोना महामारीचा कालखंड असेल किंवा वाढत चाललेले रस्तेअपघात असतील किंवा ऐन तिशी-पस्तीशीमध्ये हृदयविकाराचे वाढते प्रमाण असेल, या सर्वांमुळे आरोग्याबाबतची, जीवनाबाबतची शाश्वती कमी होत चालली आहे. वाढलेल्या आजारव्याधींचा सामना करताना मध्यमवर्गीय, निम्न मध्यमवर्गीय कुटुंबांचे अर्थकारण पार कोलमडून जाते. विशेषतः रुग्णालयात दाखल करावे लागल्यास भरमसाठ महागलेल्या वैद्यकीय सेवांची बिले भरताना अनेक जण कर्जबाजारी होतात. या सर्वांपासून आर्थिक सुरक्षितता मिळवण्यासाठी गेल्या दशकभरामध्ये आरोग्यविमा घेण्याकडे नागरिकांचा कल वाढू लागला. सुरुवातीच्या काळात कशाला हवा आरोग्यविमा, असे म्हटले गेले; पण कोरोना महामारीच्या काळात याची उपयुक्तता शतपटींनी सिद्ध झाली. कारण आजकाल आरोग्य सेवा महाग झालेली असल्याने डॉक्टरांचे तपासणी शुल्क आणि रुग्णालयाचे भलेमोठे बिल हे प्रत्येकाच्या आवाक्यातील गोष्ट नाही. अशावेळी विमाअसल्यास वैद्यकीय उपचारांच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला चांगल्यातील चांगली सुविधा घेताना आर्थिक टंचाईची समस्या जाणवत नाही. कॅशलेससारखे पर्याय उपलब्ध झाल्यामुळे आरोग्यविमा

अधिक लाभदायक ठरू लागला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

आरोग्यविषयी नियमांचे कितीही पालन केले तरी शरीराशी संबंधित कोणते ना कोणते आजार होत राहतातच. वातावरण, उष्णता, प्रदूषण, संसर्ग, दुषित हवा या कारणामुळे व्यक्तीची तब्येत ढासळू शकते. अभिनेता शाहरुख खानला अहमदाबादेत तीव्र उन्हाचा त्रास झाल्याने दोन दिवस दवाखान्यात राहावे लागले. हायप्रोफाईल व्यक्तीची अशी गत असेल तर सामान्यांच्या आरोग्याची परवड विचारायला नको. वाढत्या वयामुळे रोगप्रतिकारक शक्ती देखील कमी होत राहते. हायपरटेन्शन आणि मधुमेहासारखे आजार हे प्रत्येक पाचपैकी एकाला जडलेले आहेत. वयाचीसाठी ओलांडल्यानंतर कधी मोतीबिंदूचे ऑपरेशन करण्याची वेळ येते, तर कधी हृदयावर, गुडघ्यावर शस्त्रक्रियेची वेळ येते. चांगल्या रुग्णालयात याबाबतचे उपचार घेण्यासाठी दोन-चार लाख रुपये सहज खर्च येतो. अशा वेळी हेल्थ इन्शूरन्सचे महत्त्व नाकारता येत नाही.

परंतु या विम्यासाठी आकारण्यात येणारा हप्ता हा अलीकडील काळात प्रचंड वाढला आहे. तो वाजवी राहावा यासाठी केंद्र सरकार आणि आरोग्य मंत्रालयाने विचार करायला हवा अशी मागणी सातत्याने केली जात आहे. कारण हा मुद्दा जनआरोग्याशी संबंधित आहे. गेल्या एक वर्षात हेल्थ इन्शूरन्सच्या हप्त्यात २५ ते ५० टक्के वाढ झाली असून ही बाब चिंताजनक आहे. विशेष म्हणजे याबाबत नाराजी व्यक्त होत असतानाच आगामी काळातही विमा कंपन्यांकडून आरोग्य विम्याच्या हप्त्यात १० ते १५ टक्के वाढ केली जावू शकते असे म्हटले जात आहे.

इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी अर्थात ईर्डाने आरोग्य विम्यासंदर्भात काही नियम बदलल्यानंतर आता विमा कंपन्यादेखील आपल्या धोरणात काही बदल करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच धोरणबदलाअंतर्गत विम्याचे प्रमियम महागण्याची शक्यता आहे. तशा प्रकारचे मेलदेखील विमा कंपन्यांकडून ग्राहकांना पाठवले जात आहेत. तुम्हाला चांगल्यातला चांगला प्लॅन देता यावा म्हणून आम्हाला प्रमियममध्ये काहीशी वाढ करावी लागत आहे, असे या मेलमध्ये सांगण्यात येत आहे.

आरोग्य विम्याचा हप्ता वाढण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे यावर १८ टक्के दराने आकारण्यात येणारा जीएसटी. वास्तविक पाहता, नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित घटकांवर जीएसटी आकारला जाऊ नये किंवा तो वाजवी असावा अशी अपेक्षा व्यक्त केली जाते; परंतु अन्नधान्यावर जीएसटी आकारणाऱ्या सरकारच्या कानापर्यंत ही हाक ऐकू जाण्याची सूतराम शक्यता नाही. दुसरीकडे या क्षेत्राचे अर्थकारणही अब्जावधी डॉलर्सचे असल्याने त्यातून उत्पन्न मिळवण्याचा मोह सरकारलाही सुटणारा नाही. पण याचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे. सद्यस्थितीत १५ लाख रुपयांचा आरोग्यविमा संपूर्ण कुटुंबासाठी घ्यावयाचा झाल्यास साधारणतः २५ ते ३० हजार रुपये वार्षिक हप्तारुपाने भरावे लागतात. आता नव्या नियमांनंतर यामध्ये २० टक्क्यांची वाढ झाल्यास हा हप्ता ३५ हजारांपर्यंत वाढणार आहे. विमा हा आपत्कालीन परिस्थितीत आधार म्हणून उदयास आला आहे. अशा वेळी त्यासाठीचा खर्च हा वाजवीच असला पाहिजे याबाबत कंपन्या आणि शासनाने दक्ष राहणे गरजेचे आहे. तरच अधिक संख्येने नागरिक विमा उतरवतील. मात्र याकडे कानाडोळा करत जवळपाससर्वच कंपन्या आरोग्य विम्याच्या हप्त्यात वाढ करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे पॉलिसीधारक चिंताग्रस्त झाले आहेत.

आरोग्य विमा क्षेत्रात आर्थिक वर्ष २०२४ मध्ये सुमारे एक लाख कोटी रुपयांचा हप्ता जमा झाला असून तो २० टक्के चक्रवाढ व्याज दराने होणाऱ्या वार्षिक वाढीचा दर दाखवतो. २०२२ मध्ये आरोग्य विम्याच्या हप्त्यात प्रचंड वाढ झाली. विमा कंपन्यांनी २०२२-२३ मध्ये कोरोनाची आणखी एक लाट येईल, असे गृहित धरले होते. त्यामुळे त्यांनी हप्त्यात वाढ केली होती. पण कोरोनाची तीव्रता कमी झाली आणि लसीकरण झाल्याने नागरिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढली. अशावेळी विमा कंपन्यांनी हप्त्यात काही प्रमाणात सवलत देणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी दरवाढ कायम ठेवली.एका सर्वेक्षणानुसार गेल्या वर्षभरात ५२ टक्के व्यक्तिगत पॉलिसीधारकांच्या हप्त्यात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाली तर ११ हजार पॉलिसीधारकांतील २१ टक्के पॉलिसीधारकांनी त्यांच्या वार्षिक हप्त्यात ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक वाढ झाल्याचे सांगितले.

दुसरीकडे चांगल्या सुविधांच्या नावाखाली विम्याचा हप्ता वाढवण्यात येत असल्याचा दावा कंपन्या करत असल्या तरी प्रत्यक्षात आरोग्यविम्याचा लाभ घेताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. याबाबत नेहमीच तक्रारी केल्या जातात. पॉलिसी ग्राहकाला देताना अनेक अटीशर्थीविषयी पुरेशी माहिती दिली जात नाही. याबाबतचे विवरण बारीक शब्दांत दिलेले असते आणि त्याचे वाचन कोणी करत नाही. त्यामुळे कोणते ना कोणते कारण देत विम्याचा दावा नाकारला जातो किंवा रक्कम देण्यास विलंब केला जातो. देशभरातील ३०२ जिल्ह्यांतील ३९,००० हून अधिक लोकांमध्ये केलेल्या या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की पॉलिसीधारकांना दावे नाकारणे, पेमेंट आणि त्यांच्या सेटलमेंटसाठी बराच वेळ लागणे यासारख्या आव्हानांचा सामना ग्राहकांना करावा लागला आहे. 'लोकल सर्कल' या सर्वेक्षण संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातील ९३ टक्के लोकांनी यात बदल केले पाहिजेत असा सल्ला दिला आहे. विमा कंपन्यांना त्यांच्या वेबसाइटवर तपशीलवार दावे आणि पॉलिसी रद्द करण्याचा डेटा दर महिन्याला उघड करणे अनिवार्य करण्याची मागणी देखील ग्राहकांनी केली आहे.

आज उत्पन्नस्तर वाढलेल्या व्यक्तींसाठी आरोग्य विम्याचा महागलेला हप्ता हा फारसा काळजीचा नसला तरी त्यांच्याकडून चांगल्या सुविधांची अपेक्षा ही केली जात असतेच आणि ती स्वाभाविकही आहे. पण एका बाजूला नियमांचे कारण दाखवत दरवाढ करायची आणि दुसरीकडे दावेही फेटाळत राहायचे हा दुटप्पीपणा करत विमा कंपन्या स्वतःचे उखळ पांढरे करून घेत आहेत. ग्राहकांचा आक्षेप नेमका याबाबतच असून ईर्डाने आणि केंद्र सरकारने याबाबत नागरिकांना दिलासा देण्याची गरज आहे.



धोरण

# कौशल्य विकसनाची गरज

सीए संतोष घारे

***गेल्या काही वर्षांमध्ये आपल्याकडे कौशल्य विकसनाचा मुद्दा प्रकर्षाने पुढे आला आहे. हातात पदव्युत्तर पदवी असूनही, नामांकित विद्यापीठातून शिक्षण घेऊनही बाजाराला आवश्यक असणारे कौशल्य नसल्याने हे उच्चशिक्षित मागे पडताना दिसतात. याउलट कुशल तरुण बेरोजगार राहत नाहीत. ते सहजपणे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. टेक्निशियन, मिस्त्री, मॅकेनिक, प्लंबर या कारागिरांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम राहते. ही मंडळी सरकारकडे देखील कर भरतात आणि देशाचे अर्थचक्र वेगवान ठेवतात. हे लक्षात घेता नव्या सरकारने पदवी देण्याच्या ठिकाणी कौशल्य विकासाला प्राधान्य देण्याची गरज आहे. संबंधितांना पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने धोरणनिर्मिती करायला हवी.***

सध्याच्या काळात शिक्षण आणि कौशल्य विकास यांच्यात ताळमेळ बसताना दिसत नाहीये. शिक्षणाच्या माध्यमातून मुलामुलींमध्ये कौशल्याचा विकास होणे आवश्यक आहे; मात्र प्रत्यक्षात तसे घडताना दिसत नाही. आपल्या ॲकेडेमिक कारखान्यातून डॉक्टर, इंजिनिअर, एमबीए आदी वजनदार पदव्या घेणारे लाखो तरुण बाहेर पडत आहेत. मात्र त्यापैकी बहुतांश तरुण कौशल्यप्राप्त किंवा सर्वसमावेशक ज्ञान नसलेले दिसून येतात. त्यामुळे बरेचदा ही मंडळी कोणत्याही कामाला कौशल्याने तडीस नेऊ शकत नाहीत. याउलट कुशल तरुणांना रोजगाराची टंचाई नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. तंत्रज्ञान आणि व्यावहारिक ज्ञान असणारे मग ते पदवी किंवा इंग्रजीच्या पातळीवर मागे पडलेले का असेनात, प्रत्येक अडचण सहजपणे सोडवू शकतात. कोणतेही काम करण्यासाठी पदवीपेक्षा कौशल्य असणे आवश्यक आहे.


शाळा आणि महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या मते, शैक्षणिक वर्षांत जी मुले परीक्षेत सतत अव्वल राहतात, त्यांना हुशार म्हणता येऊ शकते. शाळा आणि महाविद्यालयात चांगले गुण मिळवणारे विद्यार्थी हे अभ्यासात निष्णात असतात आणि याबाबत कोणाचेही दुमत नाही. परंतु याचा अर्थ असा नाही की हाच गुणवान असण्याचा अंतीम निकष आहे. कोणत्याही

विषयात कमी किंवा अधिक गुण मिळवल्याने एखाद्याला मठ्ठ किंवा दुसऱ्याला हुशार असे म्हणता येणार नाही. प्रत्येक विषयांत आवड असणे गरजेचे नाही. महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांना केवळ भौतिकशास्त्राची आवड होती. महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाइनची कथाही अशीच आहे. लता मंगेशकर यांना गणीत अणि विज्ञानाची आवड नव्हती. सचिन तेंडुलकर किंवा महेंद्रसिंह धोनी यांचे अकेडेमिक रेकॉर्ड बेताचे होते; परंतु ते आपल्या क्षेत्रात दिग्गज बनले. समाजात अशा कुशाग्र व्यक्तींची अनेक उदाहरणे सापडतील. दुसरी बाजू म्हणजे परीक्षेच्या काळात एखादा विद्यार्थी आजारी पडू शकतो किंवा चुकीच्या संगतीमुळे त्याची अभ्यासाची आवड कमी राहू शकते किंवा सुरुवातीच्या काळात त्याची हुशारी दिसणार नाही. परंतु हे विद्यार्थी योग्य वेळी मेहनत करत सतत जागरूक राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत परीक्षेत बाजी मारतात. हा फंडा म्हणजे 'जेव्हा जाग, तेव्हाच पहाट' प्रमाणे काम करतो. एखाद्या विद्यार्थ्याच्या मनात यश मिळवण्यासांठी ज्योत पेटते तेव्हा तो परीक्षेत दुसऱ्या किंवा तिसऱ्या श्रेणीत उत्तीर्ण होऊनही आयएएसच्या कठीण परीक्षेत आघाडीच्या वीस किंवा ५० व्या स्थानावर दिसतो. नोकरी हेच यशाचे निकष म्हणून गृहित धरले नाही तर काहीतरी वेगळे करून दाखविण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन आयुष्यात यशस्वी होणारे अनेक विद्यार्थी दिसतील. 'थ्री इडियट'मध्ये दाखविलेले प्रसंग नाकारू शकत नाहीत. प्रत्येक मुलगा इंजिनिअर किंवाडॉक्टर व्हावा हे आवश्यक नाही. आपल्या कौशल्याला चालना देणारे आजघडीला असंख्य क्षेत्र उपलब्ध आहेत आणि तुम्ही कोणत्याच मुलाला कमी लेखू शकत नाहीत. हुशार किंवा कौशल्याच्या आघाडीवर कोणाला किती पात्र समजता, हे आपल्या दृष्टीकोनावर अवलंबून असते.

लोकसेवा आयोगाने २०१३ मध्ये पहिल्यांदा प्रारंभिक आणि मुख्य परीक्षेतील गुण सार्वजनिक केले. यात १००४ विद्यार्थी यशस्वी झाले आणि पहिल्या क्रमाकांवर असलेल्या विद्यार्थ्यांने ५३ टक्के मिळाले होते. शेवटच्या पायरीवर असलेल्या विद्यार्थ्याला लेखी परीक्षेत ३० टक्के गुण मिळवले होते. पूर्वी युपीएससी परीक्षेत ७५ ते ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणारे विद्यार्थी यशस्वी मानले जायचे. युपीएससी सोडा अजूनही अनेक सरकारी विभाग उदा. राज्य लोकसेवा आयोग, बँक, रेल्वे, कर्मचारी निवड मंडळ आदी निवड संस्था यशस्वी उमेदवारांचे गुण सार्वजनिक केले जात नाहीत.

एकीकडे दहावी आणि बारावी परीक्षेत विद्यार्थी शंभर टक्के गुण मिळवतात, तर दुसरीकडे युपीएससीच्या परीक्षेत सामान्य वर्गातील उमेदवार लेखी परीक्षेत केवळ ३० टक्के गुण मिळवत अंतिम यादीत सामील होतो. दहावी आणि बारावीला पैकीच्या पैकी गुण मिळवणारे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत सामील होत नाहीत आणि जे सहभागी होतात, त्यांचे कौशल्य तुलनेने फिके पडताना दिसते. मग दहावी अणि बारावीला पैकीच्या पैकी गुण देणे चुकीचे आहे का? असा प्रश्न विचारला जातो. स्थिती एवढी वाईट आहे की बँक आणि अन्य खासगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थेत भरती करण्याच्या उद्देशाने घेण्यात येणाऱ्या परीक्षेत सर्वोच्च स्थान घेणाऱ्या विद्यार्थ्याला शंभर गुण सोडा ६० टक्के देखील गुण मिळवताना दमछाक होते. देशात इंजिनिअरिंग, मेडिकल, आयटीआय तसेच कौशल्य विकास अभ्यासक्रमांची गरज बोलूनदाखविली जात आहे. मात्र या अभ्यासक्रमातील धडे हे नावापुरतेच आहेत. या ठिकाणी अभ्यास करूनही बहुतांश विद्यार्थी कौशल्यहीन होतात, तर कौशल्यप्रपाप्त तरुण देशाच्या सर्वसमावेशक विकास निश्चित करण्यासाठी नेहमीच पुढे राहतात.

कुशल तरुण बेरोजगार राहत नाहीत. ते सहजपणे कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. टेक्निशियन, मिस्त्री, मॅकेनिक, प्लंबर या कारागिरांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम राहते. ही मंडळी सरकारकडे देखील कर भरतात आणि देशाचे अर्थचक्र वेगवान ठेवतात. हे लक्षात घेता नव्या सरकारने पदवी देण्याच्या ठिकाणी कौशल्य विकासाला प्राधान्य देण्याची गरज आहे. संबंधितांना पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने धोरणनिर्मिती करायला हवी. कारण सर्वाचे ज्ञान एकसारखे नसले तरी मेहनत सर्वच जण करू शकतात. या मेहनती वृत्तीला कौशल्य विकसनाची जोड लाभल्यास त्यातून वैयक्तिक आणि राष्ट्रीय परिवर्तन घडू शकते.


365 DAYS
ROHITRA
CONNECT FOR QUALITY AND RELIABILITY!
BIS 1180 approved transformers.
Rating up to 2500 kVA / 11 kV, 22kV, 33kV
and extended capacity up to 10 MVA.
■ Mineral Oil Filled Distribution Transformers ■ Ester Oil Filled Distribution Transformers ■ Isolation Transformers ■ Arc / Induction Furnace Transformers ■ Multi-Winding Transformers ■ Solar / Windmill applications Transformers ■ Corrugated Tank Transformers ■ Hermetically Sealed Maintenance-free Transformers ■ Transformers with On Load Tap Changer (OLTC)
Office: Pune, Maharashtra, India. T. +91 20 48618683, M. +91 7219617700
Works : Sanaswadi, Dist. Pune, Maharashtra, India. M. +91 7219131053
ROHITRA
INDIA PRIVATE LIMITED
Power to you...!
www.rohitraindia.com
info@rohitraindia.com
NABCB
ISO 9001:2015
ICS
BIS
1180



MULTI SALES CORPORATION
Solution Beyond Service
KOLHAPUR Mob No. 9423042574, 8329543753
E-Mail : multi_sales@rediffmail.com, multisalescorpoartion@gmail.com
ELECTRICAL FURNACE
GAS FIRED FURNACE
CRUCIBLE
CRUCIBLE LIFTER
DYCOTE & FLUXES
S S SHOTS
POURING LADLE
DEGASSING UNIT
GASTEC RPT MACHINE
DENSITY INDEX MACHINE
GDC MACHINE
SHOT BLASTING MACHINE
THERMOCOUPLE & TEMP CONTROLLER
ONE ROOF SALES AND SERVICE FOR ALUMINIUM FOUNDRY
1. Distributor for SKR Engineering (Furnaces) and Alucast Machines (GDC Machine) for Maharashtra
2. Channel Partner & Authorised Distributor for Foseco India Ltd. (Non Ferrous Products)
3. We also supply - Temperature Controller, L Shape Thermocouple, Furnace Coils & Spares, Gas Burners, Transfer Ladles, S. S. Shots, Aluminium Repairing Kit, Ceramic Blanket, THERMOL Fuel Additive, Bendsaw machine & Belt Sander
Corporate Office : 51, Shivaji Housing Society, 12th Lane Rajarampuri, KOLHAPUR - 416008. Ph. No. 8446523916
Works / Godown : C-3/19, Five Star MIDC Kagal- Hatkangale, KOLHAPUR - 416236. Ph. No. 9156764135, 9422074235





BAKERS PRIDE
KONARK
OVENS & BAKERY MACHINES
Manufactures of
Bakery Ovens & Machines,
Industrial Furnace, Ovens
& Heat Treatment Machines
H/O & Factory - Plot No. H-15 , 5 Star M.I.D.C , Kagal, Kolhapur- 416 236
www.konarkbakerymachines.com

## MANUFACTURING OF SERVO STABILIZER
## AIR COOLED,OIL COOLED AND STATIC. 1PHASE AND 3 PHASE



**MICROTECH**
*Your Trusted Partner*

## CONTROL PANELS



**AUTHORISED CHANNEL PARTNERS**

DELTA
CNC Solutions & Industrial Automation Product

INOVANCE
Automation Product

invt
Automation Product

## MANUFACTURING ROUGHING CNC LATHE MACHINE & SLANT BED CNC LATHE MACHINE



**SOLUTION FOR AUTOMATION IN MACHINE TOOL**

Retrofitting and Resale of USED CNC Machines,
System Integrator for DELTA and INOVANCE.

Unit -2



**MANUFACTURING DIVISION FOR ALL TYPES OF**

Electrical Control Panels, Water Solution Pump Panel,
Industrial Servo Stabilizer And Isolation Transformers.

Unit -1



**Ph.: 0231 2305251**
**Cell : 93733 86677**
**93733 86622**
www.microtech-automation.com

Unit -1 A-30, Kagal Hatkanangale 5 Star MIDC, Kolhapur, 416216.
Unit -2 Opp. Mayur Petrol Pump, Gokul Shirgaon MIDC, Kolhapur, 416216.
Branch Office - Plot No. Laxmi Building ,Opp. Manickbag ,Khanapur Road ,Udyambag , Belgaum -590008


MANUFACTURER OF ROOFING, LINER & TILE PROFILE
GHATAGE ROOFINGS PVT. LTD.
AN ISO 9001:2015 CERTIFIED COMPANY
MAKE IN INDIA
High Quality
Gauge Checking Facility
Available in All Colours
Available As Per Demand & Size
Accessories Available
CUSTOMISED COLOUR COATED ROOFING SHEETS MANUFACTURER
Factory: G-50, Kagal-Hatkanangale Five Star MIDC, Kolhapur, Maharashtra - 416203
E-Mail: ghatageroofings@gmail.com | Mobile: +91-9699797907, 9604265265


CMM Measurement & Inspection Services
ZEISS SPECTRUM 500X500X500
HEXAGON GLOBAL 1200X1000X900
MONARK
DUCTILE IRON CASTING PVT. LTD.
C 1/6, Five star MIDC Kagal, Kolhapur- 416236
Email ID : monarkductile@gmail.com
Call: 9975241896, 9225839991, 9011484008

# Advik Engineers

Transforming Ideas into Reality.



Cold Box Core Shooter Universal Parting Line



Cold Box Core Shooter Vertical Parting Line



Shell Core Shooter Vertical Parting Line



Cold Box Core Shooter Horizontal Parting Line

- Cold Box Core Shooters
- Shell Core Shooter
- Dump Bok Type Shell Moulding Machine
- Sand Conveying Systems
- Auto Sand Mixer With Auto Dosing (Cold Box)
- All Type Of Fabrication Works

Address : D-18 Kagal-Hatkanangale, Five Star MIDC Kagal.
Mob.: +91 8208232522 +91 9130592592

E-mail : info@advikengineers.com
Website : www.advikengineers.com

## Pre Engineered Buildings (PEB) Applications

| | | |
|---|---|---|
| Industrial Sheds | Cold Stores | Office Cabins |
| Warehouses | Godown | Car Parking |
| Workshops | Showrooms | Farm House |
| Factories | Exhibition Hall | Project Office Cabins |

## Proud to be associated with

Presently M and K Group is extending manufacturing support to following leading global companies for their international projects in Middle East and Europe

Thermax    ThyssenKrupp    L&T Infra    NPCIL

## Why Choose Us?

### State of the Art Manufacturing :

The factory is spread across 8 acres land with the annual production capacity of 60,000 MT. The plant is quintessentially well equipped with high precision CNC machines to fabricate and supply quality steel buildings

### Skilled Manpower :

Currently our team comprise of 250 certified, highly skilled and experienced professionals. We provide handsome opportunities to our team to showcase their talent and upscale them regularly.

### Expertise in Designing and Detailing :

Manufacturing of pre-engineered buildings requires creative approach and high precision. Our design and engineering team uses latest software for all PEB designs

### In time Project Completion :

We ensure that we keep our commitments. Every project is completed as per customers' timelines. We are proud to state that till date we have zero complaints w.r.t timelines

## Our Happy Customers

www.mandkpeb.in

M and K Building Systems Pvt. Ltd.
"Sustainable Steel Building Solutions"

9975 977994    mandkpebdesigns@gmail.com
A 85,Kagal-Hatkanangale Five Star MIDC Kolhapur (HAH) 416216

www.mandkpeb.in

# Pre-Engineered Buildings (PEB) Manufacturer

M and K Building Systems Pvt. Ltd.
"Sustainable Steel Building Solutions"

Expandable,
Cost Effective,
Flexible,
Durable,
Energy Efficient
World Class Architectural Designs

Projects Executed By Us


D-Mart, Nimshirgaon

| 18+ | 1140+ | 100% | 3+ States 11+ Districts |
|---|---|---|---|
| Years of Experience | Projects Completed | Repeat Customers | Our Presence |

## M and K Advantage

"We are one of the leading PEB Manufacturers & Erectors in South Western Maharashtra and Uttar Karnataka."

"We also assist customers for getting, approval of Industrial Corporation / town planning, government subsidy schemes and bank finance"

## Why select Pre-Engineered Buildings (PEB)?

- 100% Off-Site Factory Production
- Low Maintenance
- Quick Assembly On-Site
- Expandable
- Minimized Site Disturbance
- Flexible and Versatile
- Cost Effective
- Energy Efficient

**Go Green with Pre Engineered Buildings. They are Easy to Relocate and Recycle**

Micrometal Foundry



Pioneer



Classic Gipsm



Tushar Industries




ISO 9001:2015
LOAD LIFT
BEST QUALITY at
LOWEST OFFER
IS GUARANTEE
SIMRAN
TECHNOLOGY
Vikrant Kudale
+91 9845407235
Eot Single Girder Crane
Eot Double Girder Crane
Weigh Bridge
Hydraulic Hand Pallet
Chain Pully Block
Electric Chain Hoist
Electric Wire Rope Hoist
Platform Scale
Goods Lift
Hanging Scale
High Accuracy Electronic Weighing Scale
Electric Mini Crane
Hydraulic Stakcers
Wire Rope Hoist
Motorised End Carrage
Wire Rope Double Gurder Crab
Heavy Industrial Crane (EOT)
Industrial Zip Crane
OFFICE
Office : 2009/1A,
1st Floor Bilgi Jewellers,
Ganapat Galli, Belgaum
FACTORY
Work : Plot No. B13,
IT Park, KSSIDC Industrial
Area, Desur, Belgaum
W: www.simrantechnology.com E: simrankudale@gmail.com




BSUK
Since 1987
Kolhapur | Mumbai | Goa

MAKE IN INDIA
Business Service Unit of Kolhapur

SafeSeal®
Simply Packaging

SAFESEAL
MACHINES PVT. LTD.

# आमच्या असंख्य ग्राहकांसाठीचं

# ऑटो पॅकेजिंग व बॅच कोडींग

# अभ्यासपूर्वक अद्यावत मशिनची मालिका.. कोल्हापूरातून..!

**मुख्य कार्यालय:** जी 135. एम.आय.डी.सी. टेलिफोन ऑफिस जवळ, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर- 416234

9371672126, 9321202112, 9371100659 (0231) 2672126 R
**शाखा नं.1 :** मुंबई 9322599203 (022) 22071783
**शाखा नं.2 :** गोवा 9371172126 (0832) 2252290

**फॅक्टरी:** D-56/२, कागल-हातकणंगले फाईव्ह स्टार, एम.आय.डी.सी., कोल्हापूर - 416 236

www.bsuk.in • bsuk99@yahoo.com • www.safeseal.in



**Balancing between running a smooth business and at the same time protecting it from unforseen factors is like sailing in a storm..**

We at Midas Investment Consultancy, understand this better as an investment partner... With our rich experience of 25 years, let us help you sail through these storms by securing your business assets and liabilities..

MIDAS
INVESTMENT CONSULTANCY

**Mrs. Savita Sagare**
**Cell: +91 98500 99477**
Shop No. 10, HR3 Building, Star Ashiayana,
Near Kolhapur Public School, Morewadi Naka,
Kolhapur. email: savitasagare@ymail.com

**OUR EXCLUSIVE INDUSTRIAL SERVICES**

- Factory Insurance.
- Raw, Scrap & Finished Material and Machinery Insurance.
- Labour Insurance.
- Industrialist Income protection plans.
- Life & Health Insurance.
- Group Gratuity & Provident Fund Schemes.
- Import & Export Insurance.

LIC
The New India Assurance Co. Ltd




MakNet®

# One Step Ahead, Always... In Quality & Service



- Hydraulic Elevators
- Passenger Elevators
- Hospital Elevators
- Home Elevators
- Car Elevators
- MRL Elevators
- Gearless Elevators
- Bungalow Elevators
- Goods Elevators
- Service Elevators
- Capsule Elevators
- Escalators

## Excellent Product Range Supported By Excellent Service




MakNet®
INDUSTRIES PVT. LTD.

**Corporate office :**
3rd Fl, Bhaskar Plaza, Shahupuri, Kolhapur, India - 416 001
+91 231 2666221/24, 9326269314
mak1@maknet.co.in, mak2@maknet.co.in

Belagavi: +91 9326269314 | Vijapur: +91 9326269309
mak6@maknet.co.in
www.maknet.co.in